cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-१०२ | शुक्रवार दि.०२ ऑगस्ट २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने- ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### हा प्रकोप मानवनिर्मित ?

केरळमधील वायनाड जिल्ह्यात भूस्खलनाच्या घटना घडल्यामुळे किमान १४३ जण ठार झाले आहेत. वायनाडच्या मुंडक्कई गावाचे भूस्खलनात मोठे नुकसान झाले आहे. वायनाडमधील भूस्खलनाबाबत असे सांगितले जाते की वायनाड हा केरळचा एकमेव पठारी भाग आहे. २०२१ च्या भारतीय भूगर्भ संस्थेच्या अहवालानुसार केरळचा ४३ टक्के भाग हा भूस्खलनात मोडतो. वायनाडची ५१ टक्के जमीन ही उताराची आहे. त्यामुळे तेथे कायम भूस्खलनाची समस्या उद्भवते. वायनाडचे पठार पश्चिम घाटात ७०० ते २१०० मीटर उंचीवर आहे. मान्सून पश्चिम घाटावर धडकतो. त्यामुळे वायनाडमध्ये जोरदार पाऊस होतो. या भागात नद्यांना पूर आल्याने मोठे नुकसान होते.

## भारतीय खेळाडूचा पॅरिसमध्ये कार अपघात

पॅरिस : पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेतून भारतीयांसाठी धक्का देणारी बातमी समोर आली आहे. भारतीय गोल्फपटू दीक्षा डागर हिचा पॅरिसमध्ये ३० जुलै रोजी कार अपघात झाला होता आणि ती बातमी आज ढळक ने दिली आहे. २३ वर्षीय खेळाडूला फार दुखापत झाली नसून ती सुरक्षित आहे. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये महिलांच्या वैयक्तिक गोल्फ स्पर्धेसाठी ती सहभाग घेण्याची अपेक्षा आहे. दीक्षा ७ ऑगस्टपासून खेळताना दिसणार आहे.

# ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्येही देशात सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडणार

**पुणे । प्रतनिधी**

**राज्यात ऑगस्ट महिन्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस राहू शकतो. विदर्भ, मराठवाडा आणि खानदेशात पावसाचे प्रमाण कमी राहण्याचा अंदाज आहे. तर कोकण आणि मध्य महाराष्ट्रात सरासरी पाऊस पडू शकतो. मात्र पुढील दोन महिन्यांमध्ये म्हणेजच ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात पाऊस सरासरीपेक्षा अधिक राहू शकतो, असा अंदाज भारतीय हवामानशास्त्र हवामान विभागाने दिला.**

भारतीय हवामानशास्त्र विभागाचे महासंचालक मृत्यूंजय मोहपात्रा यांनी मान्सून हंगामाच्या दुसऱ्या टप्प्याचा आणि ऑगस्ट महिन्याचा अंदाज गुरूवारी (दि.१) जाहीर केला. त्यांनी सांगितले की, जून आणि जुलै महिन्यात देशात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडला. पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा १.८ टक्के जास्त होते. पान २ वर



## हवामान विभागाचा अंदाज

### ऑगस्ट आणि सप्टेंबरचा अंदाज

ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात महाराष्ट्राच्या बहुतांशी भागात सरासरी पाऊस पडण्याचा अंदाज आहे. हवामान विभागाने ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात देशात सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडण्याचा अंदाज जाहीर केला. देशाच्या बहुतांशी भागात या दोन्ही महिन्यांमध्ये सरासरीपेक्षा जास्त पाऊस पाहील. मात्र ईशान्य आणि शेजारच्या पूर्व भार, लडाख, सौराष्ट्र आणि कच्छ तसेच मध्य भारतातच्या काही भागात सरासरीपेक्षा कमी पाऊस राहील अंदाज दिला.

### ऑगस्टमध्ये खंड पडणार?

हवामान विभागाने ऑगस्ट महिन्यात देशात सरासरी पाऊस पडेल, अशा अंदाज दिला. मात्र देशातील अनेक भागात ऑगस्ट महिन्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस राहील असेही संकेत दिले. महाराष्ट्रातील विदर्भ, मराठवाडा आणि खानदेशातील अनेक भागात ऑगस्ट महिन्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस राहण्याचा अंदाज आहे. तर कोकण आणि मध्य महाराष्ट्रात सरासरी पाऊस पडेल, असा अंदाजही हवामान विभागाने दिला.

## पूजा खेडकरचा अटकपूर्व जामीन फेटाळला!

नवी दिल्ली । वृतसंस्था



केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) परीक्षेत फसवणूक केल्याचा आरोप असलेल्या पूजा खेडकरला न्यायालयाने अटकपूर्व जामीन नाकारला. दिल्लीतील पटियाला हाऊस न्यायालयात याप्रकरणी गुरूवारी (दि.१) सुनावणी पार पडली. अतिरिक्त सत्र न्यायाधीश देवेंदर कुमार जंगला यांनी खेडकर यांना अटकपूर्व जामीन नाकारला, त्याबरोबरच दिल्ली पोलिसांना तपासाची व्याप्ती वाढवण्याचे निर्देश दिले. न्यायालयाने इतर कोणत्याही व्यक्तींनी ओबीसी आणि अपंगत्व अंतर्गत आरक्षणाचा लाभ घेतला आहे का? याचा तपास करण्यास सांगितले.

पूजा खेडकरला युपीएससीमधील कोणी अधिकारी मदत करत आहे का? याचाही तपास दिल्ली पोलिसांनी करावा, असे न्यायालयाने सांगितले. अटकपूर्व जामीन दिल्यास खेडकर तपासामध्ये सहकार्य करणार नाही, असा युक्तीवाद दिल्ली पोलिसांचे वकील अतुल श्रीवास्तव यांनी केला आहे. दिल्ली पोलीस आणि यूपीएससी या दोघांनीही युक्तिवाद केला पान २ वर

# संभाजीराजे छत्रपतींनी दंगल घडवली

## छत्रपती शिव-शाहूंच्या विचारांशी गद्दारी केली-जितेंद्र आव्हाड

**मुंबई । पतिनिधी**

**कोल्हापूरातील विशाळगडावर झालेल्या दंगलीला संभाजीराजे छत्रपती यांना जबाबदार आहेत, असं म्हणत त्यांचं रक्त तपासलं पाहिजे, असं शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते जितेंद्र आव्हाड म्हणाले होते. त्यानंतर संभाजीराजेंच्या स्वराज्य संघटनेच्या कार्यकर्त्यांनी आज (दि.१) ठाण्याजवळ जितेंद्र आव्हाडांच्या गाडीवर हल्ला केला. दरम्यान, गाडीवर हल्ला झाल्यानंतर जितेंद्र आव्हाड संतप्त झाले आहेत. 'संभाजीराजे (छत्रपतींनी दंगल घडवली, छत्रपती शिव-शाहूंच्या विचारांशी गद्दारी केली'',असं जितेंद्र आव्हाड म्हणाले आहेत. ते पत्रकार परिषदेत बोलत होते.**



जितेंद्र आव्हाड म्हणाले, मी त्यांना छत्रपती संभाजी आणि राजे बोलत होतो, पण त्यांनी जी दंगल घडवली आता त्यांना मी त्यांना राजे म्हणणार नाही. हल्ला करणारे तिघेच होते. माझ्याकडे चार पोलीस आणि त्यांच्याकडे चाळीस गोळ्या होत्या. मी याला हल्ला म्हणणार नाही.

सामाजिक एकता या घराण्याने राखली पाहिजे होती. मी अजून त्वेशाने आणि तीव्रतेने बोलेन. स्वतः च्या वडिलांनी तुमचा निषेध केला. आपले वडील खासदार झाले ही त्यांच्या मनातली आग आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि शाहू महाराज यांच्याशी संभाजीने गद्दारी केली आहे. त्यांचं काम त्यांनी केलेलं आहे आम्ही आमचं काम पान २ वर



## जितेंद्र आव्हाड यांच्या गाडीवर हल्ला

छ. संभाजीनगर : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख जितेंद्र आव्हाड यांच्या चालत्या गाडीवर भर रसत्त्यात हल्ला झाला आहे. तीन अज्ञात इसमांनी जितेंद्र आव्हाड यांच्या गाडीवर हल्ला केला आहे. माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांच्यावर जितेंद्र आव्हाड यांनी केलेल्या टीकेवरुन हा हल्ला करण्यात आला आहे.

संभाजीराजे छत्रपती यांनी विशाळगडावर झालेल्या अतिक्रमणच्या विरोधात आक्रमक भूमिका घेतली होती. त्यांच्या संघटनेकडून विशाळगाडवर आंदोलनही करण्यात आले होते. या आंदोलनानंतर जितेंद्र आव्हाड पान २ वर

# संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त ११८२ जणांचे रक्तदान

## सकल मराठा समाज माजलगावच्या वतीने केले होते आयोजन

**माजलगाव । प्रतिनिधी**

**संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त सकल मराठा समाज माजलगाव च्या वतीने दि.१ ऑगस्ट गुरुवार रोजी आपले पाटील नेतृत्व नेक, प्रत्येकाने झाडे लावा एक या अनुषंगाने तालुक्यातील प्रत्येक गावामध्ये मराठा समाजाच्या बांधवांनी एक झाड लावण्याचे व रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरामध्ये सर्व जाती धर्माच्या ११८२ जणांनी रक्तदान केले.**




एक ऑगस्ट रोजी मराठा आरक्षण चळवळीचे नेते संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांचा वाढदिवसानिमित्त सकल मराठा समाज माजलगाव च्या वतीने माजलगाव मध्ये विविध कार्यक्रमाचे पान २ वर

## झारखंडमध्ये भाजपच्या १८ आमदारांचे निलंबन

**रांची । वृतसंस्था**

झारखंडमधील भाजपच्या १८ आमदारांना असभ्य वर्तन केल्याप्रकरणी २ ऑगस्ट रोजी दुपारी २ वाजेपर्यंत विधानसभेतून निलंबित करण्यात आले आहे. या आमदारांना मार्शलच्या मदतीने सभागृहाबाहेर काढण्यात आले कारण निलंबनानंतर या आमदारांनी सभागृह सोडण्यास स्पष्ट नकार दिला होता. सभागृहाचे अध्यक्ष रवींद्रनाथ महतो यांनी आज या आमदारांवर सदनाचा अवमान केल्याच्या आरोपावरून निलंबित केले.

हे सर्व आमदार एक दिवस आधी मार्शलच्या मदतीने विरोधी आमदारांची सभागृहातून हकालपट्टी केल्याच्या विरोधात आंदोलन करत होते. गेल्या बुधवारी, ३१ जुलै रोजी विरोधी भाजप आणि ऑल झारखंड स्टुडंट्स युनियन पक्षाच्या आमदारांना मार्शलच्या मदतीने सभागृहाबाहेर काढण्यात आले होते. मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी रोजगारासह महत्त्वाच्या प्रश्नांशी संबंधित प्रश्नांना उत्तरे न दिल्याच्या निषेधार्थ या आमदारांनी जागेवरून जाण्यास नकार दिला होता. तर आज सभागृहाची पान २ वर

# तीन लाख ४४ हजार ८७६ लाभार्थ्यांचे लाडकी बहिण योजेनेत अर्ज दाखल

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्ह्यामध्ये आतापर्यंत ३ लाख ४४ हजार ८७६ महिलांनी मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण या योजनेमध्ये ऑनलाईन तसेच ऑफलाइन अर्ज दाखल केले आहेत.**

महसूल पंधरवाडा निमित्त जिल्हाधिकारी कार्यालय आणि महिला व बालविकास यांच्या संयुक्त विद्यमाने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमध्ये लाभार्थी महिलांची नोंदणी आणि अर्जाची पडताळणी करण्याची विशेष मोहीम आयोजित करण्यात आली आहे. या अंतर्गत प्रत्येक तालुक्यात तालुकास्तरीय समितीमार्फत ऑनलाईन अर्जांची छाननी सुरू करण्यात आली आहे. १३६६२ अर्जांना स्वीकृती देण्यात आली आहे. ज्यांच्या ऑनलाईन अर्जात कागदपत्राच्या बाबतीत काही त्रुट्या आढळून आले आहेत. त्यांच्या मोबाईलवर मेसेज जात आहे. अश्या अर्जदार महिलांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत नारी शक्ती दूत ॲपच्या माध्यमातून ज्या मोबाईल ऍप वरून ऑनलाइन अर्ज भरला आहे त्या मोबाईल मधून अर्ज एडिट करून अर्जाची त्रुटी पूर्तता पूर्ण करून घ्यावी. ज्या महिला अर्जदारांनी अर्जासोबत आवश्यक सर्व कागदपत्रे जोडलेले आहेत त्यांचे अर्ज अप्रूव्ह करण्यात येत आहेत. व तसा संदेश महिला अर्जदारांच्या मोबाईलवर पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.३१ जुलै २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ३.०० क्विंटल | २,६५१ | २,७११ | २,६८१ |
| ज्वारी/हायब्रिड :९५.५० क्विंटल | २,१०० | २,८९१ | २,४०६ |
| मूग :१४.५० क्विंटल | १,९५० | ३,०४१ | २,४५५ |
| तूर : ४.०० क्विंटल | ७,००० | ९,७०० | ८,०५० |
| उडीद : २.५० क्विंटल | ४,९०१ | ७,४०० | ६,१५० |
| बाजरी: ३५.०० क्विंटल | २,५०० | ३,६७१ | २,७१५४ |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: १३.०० क्विंटल | ४,२६० | ४,३०० | ४,२८० |
| हरभरा: ७.०० क्विंटल | ६,४५० | ६,४५० | ६,४५० |

## आता लाडकी बहीण योजनेचा अर्ज पटापट अपलोड होईल, नवी वेबसाईट सुरु!

मुंबई । प्रतिनिधी

महायुती सरकारने नुकतीच 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'ची घोषणा केली होती. या योजनेतंर्गत अल्प उत्पन्न गटातील २१ ते ६५ वयोगटाच्या महिलांना महिन्याला १५०० रुपयांची आर्थिक मदत मिळणार आहे. अर्थमंत्री अजित पवार यांनी योजनेची घोषणा केल्यानंतर लाडकी बहीण योजनेचे फॉर्म भरण्यासाठी राज्यभरातील महिलांनी महिलांनी प्रतिसाद दिला आहे. पण या योजनेमुळे महाराष्ट्रात ठिकठिकाणी महिलांचा खोळंबा झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. कीही ठिकाणी सर्व्हर जाम, पोर्टल बंद अशा अनेक समस्यांना महिला तोंड देताना दिसत आहेत. पान २ वर

## कांस्य पदकाचा वेध घेणारा स्वप्नील महाराष्ट्राचा अभिमान..!

### मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडून नेमबाज स्वप्नील कुसाळेचे अभिनंदन

**मुंबई । प्रतिनिधी**

**पॅरीस ऑलिंपिकमध्ये नेमबाजीत कांस्यपदकाचा वेध घेणारा स्वप्नील कुसाळे महाराष्ट्राचा अभिमान आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वप्नीलचे अभिनंदन केले आहे. कोल्हापुरच्या नेमबाज स्वप्नील कुसाळे याने नेमबाजीत ५० मीटर रायफल थ्री पोझिशनमध्ये कांस्य पदक पटकावले आहे.**

मुख्यमंत्री शुभेच्छा संदेशात म्हणतात, स्वप्नीलमुळे कुस्तीमध्ये भारतासाठी वैयक्तिक असे पहिले पदक पटकावणाऱ्या खाशाबा जाधव यांचे स्मरण झाले. तब्बल ७२ वर्षांनी स्वप्नीलने महाराष्ट्रासाठी या पदकाचा पान २ वर



# एससी/एसटी च्या उप-वर्गीकरणाला सुप्रीम कोर्टाचा हिरवा कंदील

## सर्वोच्च न्यायालयाकडून एससी/एसटीमधील उप-वर्गीकरण कायम

**नवी दिल्ली। वृतसंस्था**

**सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण देण्यासाठी राज्यांना अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींचे उप-वर्गीकरण करण्याचा अधिकार आहे, असा निकाल सर्वोच्च न्यायालयाच्या सात न्यायमूर्तींच्या घटनापीठाने गुरुवारी बहुमताने दिला. तसेच सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड, न्यायमूर्ती बी. आर. गवई, न्यायमूर्ती विक्रम नाथ, बेला एम. त्रिवेदी, पंकज मिथल, मनोज मिश्रा आणि सतीश सी. शर्मा यांच्या पीठाने अनुसूचित जातीच्या उप-वर्गीकरणाविरुद्धचा चिन्नैय्या खटल्यातील २००४ चा सर्वोच्च न्यायालयाचा निकाल रद्द केला.**

तसेच सर्वोच्च न्यायालयाने / मधील उप-वर्गीकरण कायम ठेवले आहे. सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांच्या घटनापीठाने ६-१ अशा बहुमताने हा निकाल दिला. न्यायमूर्ती बेला त्रिवेदी यांनी पान २ वर

### राज्यांना दिले महत्त्वाचे निर्देश

न्यायालयाने त्यांच्या निर्णयात राज्यांना आवश्यक निर्देशही दिले आहेत. राज्य सरकारे मनमानी पद्धतीने निर्णय घेऊ शकत नाहीत, असे म्हटले आहे. अनुसूचित जातींमधील कोणत्याही एका जातीला १०० टक्के कोटा देता येणार नाही. तसेच अनुसूचित जातीमध्ये समाविष्ट असलेल्या जातीचा कोटा ठरवण्यापूर्वी त्यांच्या हिस्सेदारीबद्दल ठोस आकडेवारी असणे आवश्यक असल्याचे न्यायालयाने नमूद केले आहे.



cmyk

## अग्रलेख

# हा प्रकोप मानवनिर्मित ?

केरळमधील वायनाड जिल्ह्यात भूस्खलनाच्या घटना घडल्यामुळे किमान १४३ जण ठार झाले आहेत. वायनाडच्या मुंडक्कई गावाचे भूस्खलनात मोठे नुकसान झाले आहे. वायनाडमधील भूस्खलनाबाबत असे सांगितले जाते की वायनाड हा केरळचा एकमेव पठारी भाग आहे. २०२१ च्या भारतीय भूगर्भ संस्थेच्या अहवालानुसार केरळचा ४३ टक्के भाग हा भूस्खलनात मोडतो. वायनाडची ५१ टक्के जमीन ही उताराची आहे. त्यामुळे तेथे कायम भूस्खलनाची समस्या उद्भवते. वायनाडचे पठार पश्चिम घाटात ७०० ते २१०० मीटर उंचीवर आहे. मान्सून पश्चिम घाटावर धडकतो. त्यामुळे वायनाडमध्ये जोरदार पाऊस होतो. या भागात नद्यांना पूर आल्याने मोठे नुकसान होते.

नयनरम्य हिरवाईने नटलेल्या वायनाड जिल्ह्यावर मंगळवारी निसर्ग अक्षरश: कोपला. नैसर्गिक आपत्तीत शेकडो लोक दगड–माती–चिखलाच्या ढिगा–याखाली गाडले गेले. डोंगरावरून आलेल्या दगड–मातीच्या लोंढ्याखाली गावेच्या गावे गडप झाली. जे काही वाचले ते पाण्याच्या प्रवाहात वाहून गेले. झोपेत असतानाच काळाने घाला घातल्याने लोकांना सावध होण्याची संधीच मिळाली नाही. युद्धपातळीवर बचाव मोहीम राबवण्यात येत असली तरी मुसळधार पावसामुळे बचाव कार्यात अडथळे येत आहेत. ढिगा–याखाली गाडल्या गेलेल्या लोकांचा शोध घेण्यासाठी लष्कराच्या श्वान पथकाला पाचारण करण्यात आले आहे. वायनाडमध्ये घडलेल्या घटनेने महाराष्ट्रात यापूर्वी झालेल्या दोन मोठ्या भूस्खलनांचे स्मरण होते. भूस्खलन केव्हा आणि कसे धोकादायक ठरेल ते सांगता येत नाही. नैसर्गिक आपत्तीसमोर माणसाचे फारसे काही चालत नाही हे खरे असले तरी गैरनियोजन, गैरव्यवस्थापन या समस्या आपल्यासमोर मोठ्या आपत्ती स्वरूपात उभ्या आहेत त्याचे काय? एखादी दुर्घटना घडल्यानंतर त्याबाबत उपाययोजना करणे जसे आवश्यक ठरते तसे भविष्यात अशा प्रकारच्या घटना घडू नयेत यासाठी व्यवस्थापन करणे अत्यंत आवश्यक ठरते. परंतु दुर्दैवाची गोष्ट म्हणजे नियोजन आणि व्यवस्थापनाचे गांभीर्यच लक्षात घेतले जात नाही. गैरनियोजन आणि गैरव्यवस्थापन याच मोठ्या आपत्ती असल्यासारखे चित्र आज आहे. दुर्घटना घडल्यानंतर मदतीसाठी यंत्रणा सज्ज असणे हा देखील पूर्वनियोजनाचा एक भाग ठरतो. पण समस्या किंवा दुर्घटना टाळण्यासाठी जे प्रयत्न होतात त्याला नियोजन आणि व्यवस्थापन म्हटले जाते. एकूणच सरकारी स्तरावरची ही उदासिनता अनेक समस्यांना आमंत्रण देणारी ठरते. याचे भान ठेवून नियोजन केले तर कितीतरी समस्या टाळता येऊ शकतात. ज्या वेगाने शहरांची वाढ होते आहे त्या वेगाने एकूणच पर्यावरणाचा तोल बिघडतो आहे. वारेमाप बांधकामांमुळे होणारी वृक्षतोड अथवा जंगलतोड, जमिनीची होणारी धूप अशा कारणांमुळे सुद्धा भूस्खलनासारख्या घटना घडतात. शहरांना लागून असलेले छोटे डोंगर, टेकड्या पोखरून उद्ध्वस्त केल्या जात आहेत. त्यामुळे पावसाच्या पाण्याचा होणारा निचरा भूस्खलनाच्या मार्गाने घडून येताना दिसतो. पावसाळा म्हटला की त्याचा लहरीपणा किंवा त्याचे धूमशान कुठे ना कुठे पहायला मिळणारच. पूर्वी महापूर, चक्रीवादळ अथवा अतिवृष्टी आदी प्रकार तुलनेने कमी व्हायचे. याचे मुख्य कारण म्हणजे माणसाने निसर्गाला अडकाठी केलेली नव्हती. अलिकडे अडकाठीचे प्रकार सातत्याने वाढत चालले आहेत त्यामुळे निसर्गही आता काठी उगारतो आहे.

# अंबादास डोईफोडे यांचे सोमवारपासून डोईफोडवाडी ग्रामपंचायती समोर उपोषण

**बीड। प्रतिनिधी**

**अनाधिकृत रित्या अतिरिक्त ग्राम रोजगार सेवकाची नियुक्ती रद्द करावी, ग्रामरोजगार सेवकाचा यूजर आयडी , पासवर्ड, टॅब व गेल्या काही दिवसापासून थकलेले मानधन देण्यात यावे या मागणीसाठी डोईफोडवाडी –निवडुंगवाडी ग्रामपंचायतचे ग्राम रोजगार सेवक अंबादास डोईफोडे यांनी सोमवारपासून ग्रामपंचायत कार्यालया समोर उपोषणाचा इशारा दिला आहे .**

या संदर्भात त्यांनी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, बीड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, रोहयोचे उपजिल्हाधिकारी तसेच जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले असून आपण गेल्या अनेक दिवसापासून या ग्रामपंचायतीचे ग्रामरोजगार सेवक म्हणून कार्यरत आहोत मात्र गेल्या काही दिवसापासून वैयक्तिक आकासापोटी दुय्यम ग्रामरोजगार सेवकाची नियुक्ती करून माझ्याकडून यूजर आयडी, पासवर्ड काढून घेतला. गेल्या पाच वर्षापासून माझे मानधने दिले नाही. आणि मजुरांची संख्या नसतानाही दुय्यम ग्रामरोजगार सेवक अनाधिकृतपणे नेमला. या संदर्भात अनेक वेळा तक्रारी करूनही आणि प्रत्यक्ष गटविकास अधिकारी यांनी ग्रामपंचायतीचे सरपंच आणि ग्रामसेवकाला आदेशित करूनही त्यांनी या आदेशाला केराची टोपली दाखवली. त्यामुळे कंटाळून शेवटी उपोषणाचा मार्ग स्वीकारला असून सोमवारपासून आपण ग्रामपंचायत समोर उपोषण करणार असल्याचे अंबादास डोईफोडे यांनी निवेदनात म्हटले आहे.

# महसूली अधिकारी कर्मचाऱ्यांवर राज्य शासनाचा विश्वास-जिल्हाधिकारी

**बीड। प्रतिनिधी**

**महसुली अधिकारी कर्मचाऱ्यांवर राज्य शासनाचा अधिकचा विश्वास असल्याने कुठले महत्त्वकांक्षी शासकीय योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी महसूल अधिकारी कर्मचाऱ्यांची सेवा शासन घेत असते असे, गौरव उद्गार जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी महसूल दिनाच्या कार्यक्रमानिमित्त प्रतिपादित केले.**



आज जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात महसूल दिनाचा कार्यक्रमाचे आयोजन मंत्रालय येथून करण्यात आले त्यावेळी श्री पाठक बोलत होते. या कार्यक्रमास प्रशिक्षणार्थी जिल्हाधिकारी अर्पिता ठुबे, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी,उपविभागीय अधिकारी कविता जाधव, ओंकार देशमुख उपस्थित होते. महसूल दिनानिमित्त दूरदृष्टी प्रणालीच्या माध्यमातून राज्य शासनाच्या वतीने महसूल दिनाच्या मुख्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले. उपमुख्यमंत्री अजित पवार महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह वरिष्ठ अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.या कार्यक्रमास विभागीय आयुक्त, सर्व जिल्ह्यांची जिल्हाधिकारी ऑनलाइन उपस्थित होते. या कार्यक्रमास बीड जिल्ह्यातील महसूल अधिकारी कर्मचारी उपस्थित ऑनलाइन उपस्थित होते. तत्पूर्वी जिल्ह्यातील महसूल अधिकारी कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी ही पाठक म्हणाले, महसूलचे कर्मचारी हे शासनाचे हुकुमी एक्के असल्याने त्यांच्याकडून राज्यस्तरावरील महत्त्वाच्या योजनांची अंमलबजावणीचे कार्य केले जाते. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' ही योजना जिल्ह्यातील महिला भगिनींसाठी उपयोगी ठरणारी योजना असल्याने ज्या महसूल अधिकारी कर्मचाऱ्यांना याबाबतची जबाबदारी सोपवलेली आहे ते ही जबाबदारी योग्य पद्धतीने पार पाडतील, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. महसूल अधिकारी कर्मचाऱ्यांना गोरगरिबांची सेवा करण्याची संधी आपल्या कामानिमित्त मिळत असते त्यामुळे त्यांना गरजू लोकांचे अप्रत्यक्षपणे आशीर्वादही मिळतात, असेही ते यावेळी म्हणाले. प्रास्ताविक निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी केले, महसूल दिनाचे महत्त्व उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी यांनी सांगितले, अन्न व नागरी पुरवठा विभागातील योजनांची माहिती उपविभागीय अधिकारी ओमकार देशमुख यांनी दिली. या कार्यक्रमास तहसीलदार, नरेंद्र कुलकर्णी, तेजस्विनी जाधव, अविनाश शिंगटे, सहाय्यक निबंधक श्री. आटूळे यांच्यासह नायब तहसीलदार, महसूलचे कर्मचारी मोठ्या संख्येने कार्यक्रमास उपस्थित होते.

# तुलसी महाविद्यालयात साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती आणि लोकमान्य टिळक पुण्यतिथी साजरी

**बीड । प्रतिनिधी**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ यांचे साहित्य प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध एल्गार आहे तर लोकमान्य टिळक यांचे कार्य स्वातंत्र्यासाठी त्याग आणि समर्पण आहे असे प्रतिपादन प्रा.लक्ष्मण गुंजाळ यांनी केले येथील देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी संगणक शास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय बीड येथे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती आणि लोकमान्य टिळक पुण्यतिथी निमित्त व्याख्यानाचे आयोजन गुरुवार दिनांक १ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी १० वाजता तुलसी सभागृह येथे करण्यात आले होते.यावेळी प्रमुख व्याख्याते म्हणून विचारवंत व प्रसिद्ध व्याख्याते प्रा. लक्ष्मण गुंजाळ बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय बीड प्राचार्य प्रा.डॉ. एल.एम.थोरात हे होते तर उपप्राचार्य प्रा.डी.जी.निकाळजे यांची यावेळी विशेष उपस्थिती होती. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक, तुलसी महाविद्यालय प्रा.अनंत गोणे यांना आमंत्रित करण्यात आले होते.




यावेळी बोलताना प्रा. लक्ष्मण गुंजाळ म्हणाले की, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य गतिमान करणारे आहे. अण्णाभाऊ साठे यांची विचारसरणी मानवतावादी आणि समतावादी होती असे ते म्हणाले तसेच लोकमान्य टिळक यांनी चतुरसूत्री संदेश देत स्वदेश, स्वराज्य, राष्ट्रीय शिक्षण आणि परदेशी साहित्यावर बहिष्कार टाकला त्यांनी स्वातंत्र्य लढ्यात मोठे कार्य केले त्यांच्या कार्यात त्याग आणि समर्पण दिसते असे सांगितले. यावेळी प्रमुख पाहुणे प्रा.अनंत गोणें यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन प्रवास उलगडून सांगितला. अध्यक्षीय भाषणामध्ये प्राचार्य डॉ.एल.एम.थोरात यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.किशोर वाघमारे यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा.शिल्पा बोराडे यांनी मानले. या कार्यक्रमाचे आयोजन अंतर्गत गुणवत्ता संवर्धन समिती आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांनी केले होते. यावेळी तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय बीड येथील सर्व प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# अंबडमध्ये महसूल पंधरवाड्यास सुरुवात

**अंबड । प्रतिनिधी**

**जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभागाने एक ऑगस्ट पासून जिल्ह्यात महसूल पंधरवाडा राबविण्यास सुरुवात केली आहे. महसूल विभागाने जिल्हास्तरीय महसूली कामे वेळच्यावेळी पूर्ण करुन त्यानुसार अभिलेख अद्यावत करणे , वसूलीच्या नोटीसेस पाठविणे , मोजणी करणे , अपिल प्रकरणांची चौकशी करणे इ. केलेल्या कामकाजाचा आढावा जनतेसमोर ठेवण्याकरीता दरवर्षी दिनांक १ ऑगस्ट हा ''महसूल दिन'' म्हणून राज्यभर साजरा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.**



अपर जिल्हाधिकारी रिता मेत्रेवार यांनी कळविल्यानुसार महसूल विभागाकडून देण्यात येणा–या सेवा आणि विभागाद्वारे राबविण्यात येणा–या विविध योजना याबाबत जिल्हातील नागरिकांना अधिकाधिक माहिती प्राप्त होऊन त्यांना योग्य लाभ घेता यावा तसेच , त्याबाबत नागरिकांमध्ये जागरुकता वाढावी , शासनाबद्दल आणि शासनाच्या कामकाजाबद्दल नागरिकांचा विश्वास वृद्धींगत व्हावा , यासाठी विशेष मोहिम व लोकाभिमुख उपक्रम राबविण्याच्या उद्देशाने १ ऑगस्ट या महसूल दिनापासून '' महसूल सप्ताह '' साजरा करण्याबाबतचा शासन निर्णय २५ जुलै, २०२३ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. या महसूल पंधरवाड्यात , प्रत्येक दिवशी समाजाच्या विविध घटकातील नागरिकांसाठी विशेष मोहिम / कार्यक्रम / उपक्रम / शिबीरे / महसूल अदालत यांचे आयोजन करण्यात येणार आहे. महसूल सप्ताहामध्ये जिल्ह्यात विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे निवासी उपजिल्हाधिकारी सोहम वायाळ यांनी कळविले आहे . त्यानुसार १ ऑगस्ट रोजी अंबडला महसुल दिन साजरा करुन महसुल पंधरवाड्याचा शुभारंभ झाला असून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसंदर्भात बैठक घेऊन तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी अधिकारी, कर्मचारी यांना मार्गदर्शन केले.शासनाने राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी , त्यांच्या आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करणे आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करणे , यासाठी '' मुख्यमंत्री– माझी लाडकी बहीण '' योजना सुरु केली आहे . अर्जदारांना राज्याचे अधिवास प्रमाणपत्र / राज्यातील जन्म दाखला , सक्षम प्राधिकारी यांनी दिलेला कुटुंब प्रमुखांचा उत्पन्नाचा दाखला , रेशनकार्ड, आधारकार्ड इ. कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. ' मुख्यमंत्री– माझी लाडकी बहीण '' योजनेचे अर्ज पोर्टल / मोबाईल ॲप / सेतू सुविधा केंद्रे येथून ऑनलाइन भरण्याची तरतूद करण्यात आली आहे. अंबडचे उपविभागीय अधिकारी दीपक पाटील यांनी या कालावधीत स्वतः व तहसिलदार यांनी व्यक्तीशः संबंधितांच्या अडचणी समजून घेऊन त्या निकाली काढण्याच्या अनुषंगाने मार्गदर्शन करण्यात येईल , असे म्हटले आहे . या पंधरवाड्यात नागरिकांना अधिकाधिक सोयीसुविधा देण्यात येऊन नागरिकांची कामे सुकर करण्यासाठी तहसील कार्यालयातील अधिकारी तत्पर असतील असा विश्वास अंबडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी दर्शविला आहे.

# वाहतुक नियमांबाबत कायदेविषयी जनजागृती शिबिर

**बीड । प्रतिनिधी**

**दिनांक ०१ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता किमान समान कार्यक्रमा अंतर्गत प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीडचे आनंद एल. यावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली ''वाहतुक नियमांबाबत जनजागृती कार्यक्रम'' उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, बीड येथे आयोजित करण्यात आला होता.**

सदर कार्यक्रमात वाहतुकीचे नियम या विषयावर बोलताना जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव जी. जी. सोनी यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना करताना कर्मचारी व उपस्थितांना 'वाहतुकीचे नियम' आणि 'हिट ॲण्ड रन' या कायद्याविषयी माहिती दिली. सदरील प्रकरणे आता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली निकाली निघतात अशी माहिती दिली. सदरील कार्यक्रमासाठी विशेष मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेले ॲड. झूबेर खान उपमुख्य विधी सहाय्य संरक्षक, अभियोक्ता लोक अभिरक्षक कार्यालय, बीड यांनी वाहतुक नियम मोडल्यानंतर होणारा दंड व त्यांच्या रकमा याबद्दल माहिती दिली, सर्वांनी याचा गांभीर्याने विचार करावा व आपल्या व इतरांच्या जीवाची काळजी करून वाहतुक नियम न मोडता वाहने नियमानुसार चालवावीत असे सांगितले. तर वाहन विमा क्षेत्रातील प्रसिध्द ॲड. आनंद कुलकर्णी यांनी वाहन चालवताना जेवढा वाहन परवाना महत्वाचा आहे तेवढाच विमा देखील महत्वाचा आहे हे पटवून देत सर्वांनी वाहन परवाना व त्यासोबत विमा काढला पाहिजे याबाबत यथोचित माहिती वाहनधारकांनी ठेवली पाहिजे असे सांगितले. या कार्यक्रमासाठी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, बीड मोटार वाहन निरीक्षक संतोष पाटील, सहा. मोटार वाहन निरीक्षक श्रीराम क्षीरसागर, पुजा खडकीकर, प्रदिप बिराजदार कार्यालयातील कर्मचारी तसेच उप प्रादेशिक कार्यालयातील कर्मचारी, वाहनधारकही उपस्थित होते.

## पान १वरून...

### ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्येही

तर दक्षिण भारतात सरासरीपेक्षा १८.४ टक्के पाऊस पडला. पूर्व आणि ईशान्य भारतात सरासरीपेक्षा १८.९ टक्के कमी पाऊस झाला तसेच मध्य भारतात पावसाचे प्रमाणे सरासरीपेक्षा १६.८ टक्क्यांनी जास्त होते. दक्षिण भारतात पाऊस सरासरीपेक्षा २६.७ टक्क्यांनी अधिक झाला.

---------

### जितेंद्र आव्हाड

यांनी संभाजीराजेंवर टीका केली होती. ही टीका संभाजीराजे छत्रपती यांच्या जिव्हारी लागली होती. संभाजीराजे यांच्या स्वराज्य संघटनेकडून जितेंद्र आव्हाड यांच्याविरोधात संताप व्यक्त करण्यात आला होता. त्यानंतर जितेंद्र आव्हाड आज छत्रपती संभाजीनगर दौ–यावर होते. ते संभाजीनगर येथून ठाण्याच्या दिशेला जात असताना तीन जणांनी त्यांच्या गाडीवर हल्ला केला. संभाजीराजे छत्रपती यांच्या स्वराज्य संघटनेच्या कार्यकर्त्यांनी या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे. संभाजीराजेंना छत्रपती हे म्हणणे सोडून द्या. कारण त्यांना जो अधिकार होता, त्यांची जी वंशपरंपरा होती, ज्या वंशाचे रक्त ते पुढे घेऊन जात होते त्या रक्तात काय होते आणि यांच्याकडे काय? हे तपासण्याची गरज आहे. शाहू महाराजांच्या घराण्यातील माणूस असे वक्तव्य करतो ज्यामुळे दंगल होऊ शकते तो शाहू महाराजांचा वारसदार होऊच शकत नाही , असे क्तव्य जितेंद्र आव्हाड यांनी केलें होते.

---------

### संभाजीराजे छत्रपतींनी दंगल

करत राहू, असंही आव्हाड यांनी स्पष्ट केलं. पुढे बोलताना जितेंद्र आव्हाड म्हणाले, मी मेलो तरी माफी मागणार नाही. त्यांनी महाराष्ट्राची माफी मागावी त्यांच्यामुळे मशीद तोडली गेली. ते आरोपी आहेत, आरोपी नंबर एक संभाजी आहे. मी वाईट वैचारिक लढाई सोडणार नाही. माझी कोणाविषयी तक्रार नाही. शिव, शाहू, आंबेडकर ही नाव घेऊन आम्ही जगतो आणि मरू देखील. माजी खासदार संभाजीराजे छत्रपतींवरील वक्तव्यानंतर जितेंद्र आव्हाड यांच्या गाडीवर हल्ला झालाय. आमदार जितेंद्र आव्हाड ठाण्याकडे जात असताना काही जणांनी त्यांची गाडी अडवत त्यांच्यावर हल्ला केलाय. सीएसटीएम कडून इस्ट फ्री वे वर जाताना त्यांच्या कारवर हल्ला झालाय. स्वराज्य संघटनेच्या कार्यकर्त्यांनी हा हल्ल्या केला असल्याची प्राथमिक माहिती आहे. संभाजीराजे छत्रपती यांचं रक्त तपासलं पाहिजे, असं वक्तव्य जितेंद्र आव्हाड यांनी केलं होतं. त्यामुळे त्यांच्यावर हल्ला करण्यात आलाय. दरम्यान, आव्हाड यांच्या गाडीवर झालेल्या हल्ल्याची जबाबदारी स्वराज्य संघटनेने घेतली आहे.

------------

### पूजा खेडकरचा अटकपूर्व

की, खेडकरने व्यवस्था आणि समाजाची फसवणूक केल्यामुळे या प्रकरणात कोठडीत चौकशी आवश्यक आहे. यामुळे न्यायालयाने अटकपूर्व जामीन देण्यास नकार दिला. न्यायालयाच्या या निर्णयामुळे पूजा खेडकरला तुरुंगात जावे लागणार असल्याच्या शक्यतेत वाढ झाली आहे. बुधवारी याप्रकरणी न्यायलयाने युक्तीवाद ऐकल्यानंतर निर्णय राखीव ठेवला होता. दरम्यान, यूपीएससीने बुधवारी खेडकरची निवड रद्द केली आणि तिला भविष्यातील सर्व परीक्षा आणि निवडीतून कायमचे काढून टाकले आहे. या प्रकरणात पूजा खेडकर तर्फे वकील बिना माधवन, दिल्ली पोलिसांतर्फे सरकारी वकील अतुल श्रीवास्तव आणि युपीएससीतर्फे ज्येष्ठ वकील नरेश कौशिक यांनी बाजू मांडली.

-------------

### तीन लाख ४४ हजार ८७६ लाभार्थ्यांचे

जात आहे. अप्रुव्हड असा संदेश आल्यास आपला अर्ज यशस्वीरिता भरला गेला असल्याचे कळते. तथापि ज्या महिला अर्जदारांना आपला अर्ज असा दूरध्वनी संदेश आलेला आहे त्यांनी नारी शक्ती दूत ॲपच्या माध्यमातून ज्या मोबाईल ॲप वरून ऑनलाइन अर्ज भरला आहे त्याच मोबाईल ॲप मधून अर्ज एडिट करून अर्जाची त्रुटी पूर्तता पूर्ण करून घ्यावी असे आवाहन, जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी केले असल्याचे कळविले आहे.

-------

### झारखंडमध्ये भाजपच्या

बैठक सुरू होण्यापूर्वीच भाजप आमदारांनी अध्यक्षांच्या खुर्चीसमोर येऊन मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्या राजीनाम्याची मागणी करत घोषणाबाजी सुरू केली आणि काही कागदपत्रेही फाडली होती. आज म्हणजेच गुरुवारी सभागृहाची बैठक सुरू होण्यापूर्वीच भाजप आमदारांनी खुर्चीसमोर येऊन मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्या राजीनाम्याची मागणी करत घोषणाबाजी सुरू केली. काही कागदपत्रेही तो फाडताना दिसला. अधिवेशन सुरू होण्यापूर्वी सत्ताधारी आणि विरोधी पक्षाच्या सदस्यांमध्ये वादावादी पाहायला मिळाली. काल सभागृहाबाहेर काढलेल्या भाजप आमदारांनी बुधवारी रात्र विधानसभेच्या लॉबीमध्ये घालवली.

-----------

### कांस्य पदकाचा वेध घेणारा स्वप्नील

वेध घेऊन, तशाच पद्धतीचा आनंद आणि उत्साह राज्यातील क्रीडा क्षेत्रासाठी निर्माण केला आहे. कोल्हापूर जिल्ह्यात नेमबाजीची एक मोठी परंपरा आहे. ही परंपरा स्वप्नीलने कायम राखली आहे. कांबळवाडी सारख्या ग्रामीण भागातून येऊन स्वप्नीलने आपले राज्य आणि देशाचे नाव आंतरराष्ट्रीयस्तरावर झळकवले आहे. देशासाठी वैयक्तिक पदकाची कमाई करताना, स्वप्नीलने महाराष्ट्राचा क्रीडा क्षेत्रातील गौरव वाढवला आहे. स्वप्नीलच्या या यशात त्यांचे कुटुंबिय, प्रशिक्षक, मार्गदर्शक यांचे मोलाचे योगदान आहे, या सर्वांचे महाराष्ट्रातील तमाम जनतेच्यावतीने अभिनंदन, असे नमूद करून मुख्यमंत्र्यानी यापुढेही स्वप्नीलच्या वाटचालीसाठी आवश्यक असे सर्व ते सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही दिली आहे. तसेच त्याला स्पर्धेतील पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

----------

### संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्य

आयोजन केले होते. तालुक्यातील प्रत्येक गावामध्ये आपले पाटील नेतृत्व नेक, प्रत्येकाने झाडे लावा एक या अनुषंगाने मराठा समाजाने सार्वजनिक ठिकाणी, आपल्या शेतात, आपल्या परिसरात, गावात एक झाड लावून मनोज जरांगे पाटील यांचा वाढदिवस साजरा केला. माजलगाव तालुक्यातील सकल मराठा समाजाच्या प्रत्येक बांधवांनी या अभियानामध्ये सहभागी होऊन पाटील यांना वाढदिवसाच्य शुभेच्छा दिल्या तर शहरातील काव्य हाइट्स येथील वरच्या मजल्यावर सकल मराठा समाजाच्या संपर्क कार्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते या रक्तदान शिबिरामध्ये सर्व जाती धर्माच्या ११८२ जणांनी रक्तदान केले. या कार्यक्रमाचे आयोजन सकल मराठा समाज माजलगावच्या वतीने केले होते.

----------

### आता लाडकी बहीण योजनेचा अर्ज

या पार्श्वभूमीवर सरकारने आणखी एक संकेतस्थळ सुरू केले आहे .

सरकारने योजना जाहीर केल्यानंतर या योजनेचा लाभ घेण्यासाठी फक्त नारी शक्तीदूत ॲपवरुन अर्ज करता येत होता. मात्र योजना जाहीर केल्यानंतर अनेकदा सर्व्हर डाऊन, लोड आल्याने संकेतस्थळ बंद या सारख्या समस्यांना तोंड द्यावे लागत होते. यामुळे सरकारने नवे संकेतस्थळ सुरू केले आहे. महिलांना आता हा फॉर्म घरच्या घरी ऑनलाईन पद्धतीनेही पटापट भरता येणार आहे. मुख्यमंत्री–माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत अर्ज भरण्याची प्रक्रिया अधिक सुलभ करण्याकरता संकेतस्थळ आजपासून सुरू करण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हा महिला बालविकास अधिकारी मोनिका रंधवे यांनी दिली आहे.

------------

### एसी/एटी च्या उप–वर्गीकरणाला

इतर न्यायमूर्तींच्या निर्णयाला असहमती दर्शवली. सरन्यायाधीश म्हणाले की, 'ईव्ही चिन्नैय्या प्रकरणा दिलेला निर्णय आम्ही फेटाळला आहे. उप–वर्गीकरण कलम १४ चे उल्लंघन करत नाही, कारण उपवर्गाला सूचीमधून बाहेर वगळलेले नाही.' अनुसूचित जातींमधील जातींचे उप–वर्गीकरण त्यांच्या भेदभावावर आधारित असणे आवश्यक आहे आणि राज्यांद्वारे सरकारी नोकऱ्यांमधील त्यांच्या प्रतिनिधीत्वावर आणि शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशांची आकडेवारी गोळा करून हे केले जाऊ शकते.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार दि. २ ऑगस्ट २०२४
३

## वाहतुक नियमांबाबत कायदेविषयी जनजागृती शिबीर

बीड : आज दिनांक ०१ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ११३०: वाजता किमान समान कार्यक्रमाअंतर्गत मा. श्री. आनंद एल. यावलकर साहेब, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड यांच्या मार्गदर्शनाखाली ''वाहतुक नियमांबाबत जनजागृती कार्यक्रम'' उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, बीड येथे आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमात वाहतुकीचे नियम या विषयावर बोलताना जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव जी. जी. सोनी साहेब यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना करताना कर्मचारी व उपस्थितांना 'वाहतुकीचे नियम' आणि 'हिट ॲण्ड रन' या कायदयाविषयी देखील माहिती दिली. सदरील प्रकरणे आता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली निकाली निघतात अशी माहिती दिली. सदरील कार्यक्रमासाठी विशेष मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेले ॲड. झूबेर खान उपमुख्य विधीसहाय्य संरक्षक, अभियोक्ता लोक अभिरक्षक कार्यालय, बीड यांनी वाहतुक नियम मोडल्यानंतर होणारा दंड व त्यांच्या रकमा याबद्दल माहिती देत सर्वांनी याचा गांभीर्याने विचार करावा व आपल्या व इतरांच्या जीवाची देखील काळजी करून वाहतुक नियम न मोडता वाहने नियमानुसार चालवावीत असे सांगितले. तर वाहन विमा क्षेत्रातील प्रसिध्द ॲड. आनंद कुलकर्णी यांनी देखील वाहन चालवताना जितका वाहन परवाना महत्वाचा आहे तितकाच विमा देखील महत्वाचा आहे हे पटवून देत सर्वांनी वाहन परवाना व त्यासोबत विमा काढला पाहिजे आणि याबाबत यथोचित माहिती वाहनधारकांनी ठेवली पाहिजे असे सांगितले. या कार्यक्रमासाठी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, बीड मोटार वाहन निरीक्षक संतोष पाटील, सहा. मोटार वाहन निरीक्षक श्रीराम क्षीरसागर, पुजा खडकीकर, प्रदिप बिराजदार कार्यालयातील कर्मचारी तसेच उप प्रादेशिक कार्यालयत त्यांचे कामासाठी उपस्थित असलेले बहुसंख्य वाहनधारकही उपस्थित होते.

# शरद पवार मराठा आरक्षणाच्या बाजूने की विरोधात? भूमिका स्पष्ट करावी-ॲड.आंबेडकर

## ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या आरक्षण बचाव यात्रेचे केज शहरात जंगी स्वागत

**केज । प्रतिनिधी**

वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या ओबीसी आरक्षण बचाव यात्रेचे केज शहरात जंगी स्वागत करण्यात आले आहे.दीक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रेच्या स्टिकरचे ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांनी अनावरण करून पत्रकार बांधवांना शुभेच्छा दिल्या आहेत. दिनांक ३० जुलै २०४ रोजी सकाळपासून सुरू झालेल्या ओबीसी आरक्षण बचाव यात्रेमध्ये लातूर,आंबेजोगाई केज येथे आरक्षण बचाव विषयी मार्गदर्शन केले यावेळी ॲड.प्रकाश आंबेडकर यांनी नेत्यांच्या नरड्यात काय अडकले? असा सवाल आलेल्या समाज बांधवांना विचारला असता यावेळी सरकारमधील नेत्यांची



फार मोठी गोची झाल्याचे सांगितले.तसेच यावेळी शरद पवार यांनी मराठा आरक्षणाच्या बाजूने आहोत का ? विरोधात ती भूमिका स्पष्ट करावी असे प्रकाश आंबेडकर यांनी स्पष्ट बोलून दाखवले आहे. राज्यांमध्ये सलोखा राखायचा असेल तर शरद पवारांनी योग्य भूमिका बजवावी असेही शरद पवार यांना त्यांनी आवाहन केले आहे. पुढे बोलताना ॲड. बाळासाहेब आंबेडकर म्हणाले की, आम्ही गरीब मराठ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत गरीब मराठ्यांनी आम्हाला साथ द्यावी आमचे सरकार आल्यावर त्यांना आम्ही योग्य असा न्याय देऊ असे त्यांनी बोलताना स्पष्ट केले आहे. यावेळी केज तालुकाध्यक्ष बाबासाहेब मस्के ,जिल्हा उपाध्यक्ष धनराज सोनवणे, अमोल हजारे, शरद धिवार, सय्यद रज्जाक ,प्रवीण मस्के ,भारत गायकवाड, नितीन बचुटे व केज तालुक्यातील बहुजन वंचित आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच ओबीसी बचाव आरक्षणासाठी आलेले ओबीसी कार्यकर्ते व ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्यावर प्रेम करणारे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रमेश गालफाडे यांच्या जनसंवाद मेळाव्यात सुषमा अंधारेनी पेटविली केज विधानसभेची मशाल !




### जो कोणी हातात मशाल घ्यायला तयार असेल त्याच्या मनगटात ताकद देवू -सुषमा अंधारे

**केज । प्रतिनिधी**

भाजप आणि देवेंद्र फडणवीस हे आम्ही आरक्षणाची कालमर्यादा वाढविली अशी खोटी माहिती देवून जनतेच्या डोळ्यात धूळफेक करीत असून खोटं बोलण्यात देवेंद्र फडणवीस यांचा हात कोणी धरणार नाही. असा घणाघात शिवसेना ऊबाठा गटाच्या उपनेत्या प्रा. सुषमा अंधारे यांनी केला.

तसेच भाजप आणि देवेंद्र फडणवीस हे फेक नरेटिव्ह पसरवत असून उलट ते विरोधकांवर फेक नरेटिव्हचा कांगावा करीत आहेत. असा आरोप त्यांनी भाजपवर केला. तसेच केज विधान सभेसाठी शिवसेना उबाठा आग्रही आहे. जो हातात मशाल घेईल; त्याच्या मनगटात बळ देण्याचे काम करू; परंतु महाविकास आघाडी म्हणून आम्ही सर्वजण सोबत असल्याचे त्यांनी सांगितले.

तर ज्यांनी हा जनसंवाद मेळावा आयोजित केला ते बहुजन परिषदेचे संस्थापक रमेश तात्या गालफाडे यांनी भाजपच्या आ. नमिता ताई मुंदडा यांच्यावर टीका करताना म्हंटले की, ज्या स्व. विमलताई मुंदडा यांनी बीड जिल्ह्यात सिताफळ संशोधन केंद्र उभारले आणि फळप्रक्रिया उद्योग उभारण्याचे स्वप्न होते. त्या स्वप्नाचा विसर त्यांच्या सुनेला पडला आहे.

दि. ३० जुलै रोजी केज येथील मुक्ताई लॉन्सवर बहुजन विकास परिषदेचे संस्थापक रमेश गालफाडे यांनी जनसंवाद मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्याला प्रमुख उपस्थिती ही शिवसेना उबाठा गटाच्या उपनेत्या सुषमाताई अंधारे यांची होती. त्या मेळाव्यात उपस्थितांशी संवाद साधताना म्हणणाल्या की, राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले राजकीय आरक्षण आणि सामाजिक आरक्षण हे वेगवेगळे आहे. परंतु आरक्षणाची कालमर्यादा भाजपने वाढविली असा खोटा कांगावा भाजप करीत आहे. तसेच खाजगी विद्यापीठ आणि कारखान्यात आरक्षण लागू केले नाही. लाडकी बहीण योजना आणणाऱ्या शिंदे सरकारने लाडक्या भाच्याच्या शिक्षणासाठी काय? असा प्रश्न त्यांनी शिंदे आणि फडणवीस यांना केला.यावेळी बोलताना बहुजन विकास परिषदेचे संस्थापक रमेश गालफाडे यांनी ज्या स्व. विमलताई मुंदडा यांनी बीड जिल्ह्यात उद्योग आणून बेरोजगारांच्या हाताला काम देण्यासाठी फळ प्रक्रिया उद्योगाची घोषणा केली होती. त्याच्या विसर त्यांच्या सूनबाई आ. नमिता मुंदडा यांना पडला असल्याची जोरदार टीका केली. तर मी कोणत्याही पक्षात नसून खऱ्या मागास प्रवर्गातील व्यक्तींनाच या मतदार संघातून आमदार म्हणून काम करण्याची संधी मिळावी. अशी त्यांनी अपेक्षा व्यक्त केली आणि इंडिया आघाडीची उमेदवारी मिळावी अशी सुप्त इच्छा त्यांनी व्यक्त केली आहे. या मेळाव्याला माजी आ. प्रा सुनील धांडे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे, शेकापचे भाई मोहन गुंड, प्रा. हनुमंत भोसले, शिवाजी कुलकर्णी, सामाजिक कार्यकर्ते भाई मोहन गुंड, सेवा निवृत्त गटविकास अधिकारी मिलिंद गालफाडे, सुभाष गालफाडे, महादेव गालफाडे यांच्यासह केज आणि अंबाजोगाई परिसरातील बांधव व त्यांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान या जनसंवाद मेळाव्यात सुप्रसिद्ध गायिका राधा खुडे यांच्या बहारदार गायनाचा देखील कार्यक्रम संपन्न झाला.

## सुलतानपूर वसाहत शाळेत साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील सुलतानपूर वसाहत येथील जि.प.शाळेत दि.१ ऑगस्ट गुरुवार रोजी सकाळी १० वा. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची १०४ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात सरपंच संजयभाऊ नरवडे,शाळेचे मुख्याध्यापक गणेश नवले , ग्रा.पं. सदस्य दत्ताभाऊ लोखंडे, ग्रा.पं. सदस्य दादासाहेब ढगे,अजित लोखंडे यांनी प्रतिमेचे पूजन करून केली. प्रसंगी गावातील शिक्षणप्रेमी नागरिक वसंत लोखंडे यांच्या मुलगा वंशवीर याच्या वाढदिवसा निमित्त शाळेमध्ये विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक,




शालेय समिती अध्यक्ष अशोक थोरात यांनी अण्णाभाऊ साठे यांचे समाजकार्य व जीवन चरित्र विद्यार्थ्यांसमोर व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन घनश्याम पांचाळ यांनी केले. तर आभारप्रदर्शन बालासाहेब बचाटे यांनी केले. तसेच कार्यक्रमाला उपस्थित जाधव सर, धिरडे दादा, संजू नाना लोखंडेभारत नाईकनवरे, स्वयंसेवक बालासाहेब तौर, राजेभाऊ थोरात, महादेव लोखंडे, गोरख लोखंडे,कृष्णा लोखंडे , विशाल थोरात

## आश्रम शाळेत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी

माजलगाव ( प्रतिनिधी ) तालुक्यातील रामनगर तांडा येथील माध्यमिक आश्रम शाळेत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.प्रथम आण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माध्यमिक मुख्याध्यापक सी.व्ही.मठपती हे होते तर प्रा.मुख्याध्यापक ए.बी.ईमडे ,शिक्षक एन.बी.मादरपले,आर.डी.जमजाळ,पी.जी.कांबळे, एस.डी. देशमुख, ए.बी.काटेवाड,ए.के.देशमुख, ए.के.सय्यद, जी.बी.पुलकुंडवाड,एन.आर.राठोड, आर.एन.रोकडे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक सी.व्ही.मठपती यांनी केले तर आभार आर.डी.जमजाळ यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिपाई व्ही.जे.कांबळे, आर.एन.राठोड यांनी परिश्रम घेतले.याप्रसंगी विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी निमित्त निवासी मतिमंद विद्यालय वासनवाडी फाटा पांगरी रोड बीड येथे अभिवादन करण्यात आले यात्रसंगी शाळेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी.

## श्री गणेश मंदीर शाळेत आण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी साजरी

**अंमळनेर । प्रतिनिधी**

अंमळनेर येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री गणेश विद्या मंदीर शाळेत साहित्यसम्राट आण्णा भाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.कार्यक्रमाच्या सुरूवातीला शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक आर एम हाके,जेष्ठ शिक्षक एफ एस जाधवर, उडाणे सर यांच्या हस्ते साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.यात्रसंगी विद्यालयातील ज्ञानेश्वर पोकळे,कु.वैष्णवी घुगरकर,कु.अन्विता मिसाळ, कु.प्रतिक्षा आहेर,कु.संस्कृती लटपटे ह्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी लोकमान्य टिळक व साहित्यसम्राट आण्णाभाऊ साठे यांच्याविषयी आपली मनोगते व्यक्त केली.यानंतर



शाळेच्या सहशिक्षका श्रीमती पंडागळे यांनी साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यविषयक कार्याची तसेच संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील त्यांच्या महान योगदानाची तसेच लोकमान्य टिळकांच्या स्वातंत्र्यसंग्रामातील बहुमोल कार्याची ओळख करून दिली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे सहशिक्षक ए. ए. काकडे यांनी केले तर एफ एस जाधवर यांनी उपस्थितांचे आभार मानले.याप्रसंगी विद्यालयातील आर डी खलाटे सर, एस बी काळे , सी एस डुचे, आर बी सानप, एम एस गाडीलोहार, ए ए काकडे, ए बी सदावर्ते,दहिफळे,एस सी पठाण,केंद्रे, एस इ पवार खाडे,जोशी,श्रीमती मेढे ,श्रीमती पंडागळे,श्रीमती आंधळे,श्रीमती जाधव,श्रीमती वारूळे,श्रीमती म्हस्के इ. शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## सुवर्णा दिपक बनसोडे यांचे निधन

**बीड । प्रतिनिधी**

सारडानगरी येथील रहिवाशी सुवर्णा दिपक बनसोडे (वय ५२) यांचे काल गुरूवारी दि.१ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी पावणे सात वाजता अल्पशा आजाराने निधन झाले.



त्यांच्या मृतदेहावर गुरूवारी दुपारी दोन वाजता मोंढा रोडवरील आमरधाम स्मशानभुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पाश्चात पती, दोन मुले, सून, नात असा मोठा परिवार आहे. दरम्यान, त्यांच्या परिवाराच्या दुःखात दैनिक राज्य लोकतंत्र परिवार सहभागी आहे.

## मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आष्टी तालुक्यात विविध कार्यक्रम

### चारशे जणांनी केले रक्तदान तर जिल्हा परिषद शाळेत वृक्षारोपण शृंगेरी देवी परिसरात वृक्षारोपण

**आष्टी । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणासाठी लढा उभा करणारे मनोज दादा जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आष्टी तालुक्यामध्ये विविध सामाजिक उपक्रम घेण्यात आले.आष्टी अंभोरा व धामणगाव या ठिकाणी रक्तदान शिबिर घेण्यात आले तर शृंगेरी देवी परिसरामध्ये ५०० फळझाडे लावण्यात आली .तर आष्टी तालुक्यामधील अनेक जिल्हा परिषद शाळेमध्ये आंबा या फळझाडांचे वृक्षारोपण करण्यात आले .



मराठा आरक्षणाचा लढा उभा करणारे मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आष्टी तालुक्यामध्ये विविध सामाजिक उपक्रम घेण्यात आले .हे उपक्रम आष्टी तालुक्यातील सकल मराठा समाजाकडून घेण्यात आले .आष्टी येथे रक्तदान शिबिरामध्ये १७६ जणांनी अंभोरा येथे ५० जणांनी तर धामणगाव येथे १११ जणांनी रक्तदान केले .तसेच शृंगेरीदेवी परिसरामध्ये आंबा ,चिकू ,नारळ इत्यादी फळझाडे लागवड करून जरांगे पाटील यांचा वाढदिवस साजरा केला तर तालुक्यातील प्रत्येक जिल्हा परिषद शाळेमध्ये प्रत्येकी पाच आंब्याचे झाडे लावून मनोज जरांगे पाटील यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यासाठी आष्टी तालुक्यातील सकल मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनी मोठे परिश्रम घेतले.

## पत्रकार गितांजली लव्हाळे यांना राष्ट्रीय उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार प्रदान

**वडवणी । प्रतिनिधी**

एन फिल्म प्रोडक्शन व सागर आर्ट मनमाड आणि रिपब्लिकन बहुजन सेना यांच्या संयुक्तरीत्या राष्ट्रीय सिनेकला गौरव पुरस्कार सोहळा -२०२४ नुकताच छत्रपती संभाजी नगर या ठिकाणी दि.३० जुलै २०२४ मंगळवार रोजी संपन्न झाला.

वडवणी तालुक्यातील महिला पत्रकार सौ.गितांजली लव्हाळे यांना सामाजिक,शैक्षणिक,सांस्कृतिक व कला क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल राष्ट्रीय उत्कृष्ट पत्रकार पुरस्काराने या सोहळ्यात त्यांना सन्मानित करण्यात आले.




या पुरस्कार वितरण सोहळ्याप्रसंगी राष्ट्रीय अध्यक्ष राजू भाई साबळे,निर्माता,दिग्दर्शक श्री.दीपक म्हस्के तसेच निर्माता,दिग्दर्शक व लेखक श्री.हिरामण मनोहर,महाराष्ट्र प्रदेश सचिव पंचशील,चित्रपट अभिनेते डॉ.शुभम बेंद्रे,बालकलाकार स्वरा विजय पाटील,ॲड.अविनाश थिट्टे,सुरेश शिनगारे,सुनील कोतकर,दिपाली गरड,अनिल ढोले,आयुब पटेल,रंजीत मनोरे अदिजन मान्यवर म्हणून उपस्थित होते.

या पुरस्काराला उत्तर देताना पत्रकार गितांजली लव्हाळे म्हणाल्या की,हा पुरस्कारा मिळाल्यामुळे आणखीन काम करण्याची ऊर्जा मिळाली आहे अशीच तुमची साथ व आशीर्वाद राहू द्या अस मत त्यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैशाली कंकाळ यांनी केले तर या कार्यक्रमासाठी सामाजिक, सांस्कृतिक,चित्रपट व पत्रकारिता क्षेत्रातील अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते .

पान ६ वरून...

### न.प.च्या लेखी आश्वासनानंतर

राष्ट्रीय चर्मकार महासंघ महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष प्रा.संपतराव वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राज्य प्रवक्ते रोहिदास बनसोडे, वंचित बहुजन आघाडीचे मिलिंद घाडगे, अर्जुन शिंदे, त्रिंबक शिंदे, पांडुरंग साबणे, सिताराम वाघमारे, रोहिदास शिंदे, रंगनाथ खराटे, बालाजी गायकवाड, रवी झील्ले, मुंजाजी माळवदे, बालाजी माने, रवी सातपुते, बाळू धनगे, राहुल गायकवाड,गोविंद शिंदे, शिवाजी घायाळ, सीताराम वाघमारे आदिंनी परळी नगर परिषदेसमोर आमरण उपोषण सुरू केले होते. दरम्यान परळी नगर परिषदेचे मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे यांच्या स्वाक्षरीने काम सुरू करण्याचे लेखी पत्र दिल्यानंतर उपोषणकर्त्यांनी उपोषण मागे घेतले आहे. परळी नगर परिषदेचे कार्यालयीन अधीक्षक संतोष रोडे यांच्या उपस्थितीत आमरण उपोषण मागे घेण्यात आले. संत रविदास समाज मंदिराचे काम लवकरात लवकर पुर्ण करणे करीता सचिन सुधाकर कराड, परळी वैजनाथ यांना आदेशीत केले असून संत रविदास समाज मंदिराचे वाढीव बांधकामाची प्रशासकीय झालेली असून कार्यारंभ आदेशही देण्यात आलेले आहे. कंत्राटदारास सुचित केले असुन संत रविदास समाज मंदिराचे अर्धवट राहिलेले काम सुरू करून लवकरात लवकर पुर्ण करण्यात येईल.

- त्रिंबक कांबळे, मुख्याधिकारी नगरपरिषद परळी वैजनाथ

### माळेवाडीत मनोज जरांगे

नागरिक, महिला,शाळेतील मुले यांच्या आरोग्याची तपासणी करून मोफत औषधोपचार करण्यात आले. या शिबिरासाठी डॉ. ज्ञानेश्वर सदाशिव काळे (आई हॉस्पिटल व बालरोग तज्ञ), डॉ. पंकज घोडके (जलधारा क्लिनिक बीड),डॉ.कैलास नरवडे(नरवडे हॉस्पिटल माजलगाव), डॉ. वैभव भगत (पद्मामाई हॉस्पिटल सुलतानपूर) या डॉक्टरांच्या वतीने रुग्णांची तपासणी करण्यात आली.या कार्यक्रमाचे आयोजन विनायक प्रकाश पिंगळे व समस्त गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नारायण धिरडे,रवी भगत,करण थोरात,गणेश तौर, शंकर नरवडे,विजय नरवडे,आकाश नरवडे,ज्ञानेश्वर ढगे, गणेश ढगे,सुनील निंबाळकर,संतोष धिरडे,बळीराम लोखंडे,अजय नरवडे,माऊली नावडकर,श्रीहरी नरवडे,श्रीकृष्ण मेटे, बाळु मोटे,गोपाळ लोखंडे,सोमेश्वर नावडकर,सचिन सोळंके यांच्या सह आदींनी परिश्रम घेतले.

### मूकबधिर शाळा नेकनुर

विचार समाजात पोहोचवण्यासाठी मराठा व केसरी हे वृत्तपत्र सुरू करून आपले विचार जनसामान्य लोकांपर्यंत पोहोचवली. त्याचप्रमाणे संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनीही आपल्या समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी वाचा फोडली व सर्व समाजाला एकत्र आणण्याचे कार्य ते करत आहेत त्यांच्या वाढदिवसानिमित्त सर्व उपस्थित मान्यवरांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त मूकबधिर शाळेतील विद्यार्थ्यांना मिष्ठान्न भोजन देण्यात आले होते. हा सर्व कार्यक्रम संस्थेचे मार्गदर्शक अध्यक्ष खारके सर व मुख्याध्यापक लूचारे सर यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.तसेच शाळेतील सर्व कर्मचारी वृंद यावेळी हजर होते.

### संतमूर्ती प्राणप्रतिष्ठा

यांच्या आशिर्वादाने व मार्गदर्शनाखाली चालू आहे.यानिमित्त संत मूर्ती मंदिरात सकाळी ४ ते ६ काकडा भजन,७ ते८ विष्णुसहस्रनाम व गीता पाठ,१० ते १२ गाथा भजन,४ ते ५ प्रवचन,सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ,६ ते ८ भोजन,रात्री ८ ते १० किर्तन,१० ते १२ संगीत भजन कार्यक्रम होईल.सोमवार दि.०५/०८/२०२४ रोजी रात्री ८ ते १० या वेळेत ह.भ.प. वाणीभूषण ज्ञानेश्वरजी महाराज तांबे नेवासा व मंगळवार दि.०६/०८/२०२४ रोजी युवा किर्तनकार ह.भ.प.शिवलीलाताई पाटील यांचे किर्तन आयोजित केले आहे.तसेच बुधवार दि.०७/०८/२०२४ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प.वेदांताचार्य विवेकानंद शास्त्री (कोकणरत्न) सिद्धेश्वर संस्थान शिरूर यांचे काल्याचे किर्तन होईल.त्यानंतर महाप्रसादाने या सोहळ्याची सांगता होणार आहे.कार्यक्रमाच्या सांगता सोहळ्याला बुधवार रोजी अनेक संत-महंत,राजकीय,सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांसह वारकरी भाविक - भक्त मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
शुक्रवार दि.२ ऑगस्ट २०२४


# टोमॅटोच्या दरात वाढ! ग्राहकांना दिलासा देण्यासाठी सरकारचा प्लॅन

## सुमारे २५ हजार हेक्टर शेती पुरात बुडाली, सर्वाधिक फटका ऊस पिकाला

सध्या टोमॅटोच्या दरात मोठी वाढ होत आहे. याचा शेतकऱ्यांना फायदा होत आहे. मात्र, ग्राहकांना वाढत्या दराचा फटका बसत आहे. सध्या टोमॅटोचे दर हे ८० ते १०० रुपये किलोवर पोहोचले आहेत. अशातच सरकारनं ग्राहकांना दिलासा देण्यासाठी कमी दरात टोमॅटोची विक्री सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. नॅशनल कोऑपरेटिव्ह कन्झ्युमर्स फेडरेशन ऑफ इंडियाने कमी दरात टोमॅटो विक्रीचा निर्णय घेतला आहे. सोमवारपासून दिल्ली एनसीआरमध्ये ६० रुपये किलो दराने टोमॅटो विकण्याचा निर्णय घेतला आहे.

पावसामुळ टोमॅटोच्या पुरवठ्यावर परिणाम

ग्राहक व्यवहार मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, २७ जुलै रोजी दिल्लीत टोमॅटोची किरकोळ किंमत ७७ रुपये प्रति किलो होती. गुणवत्तेनुसार आणि स्थानानुसार, काही भागात दर ८० रुपये किलोपेक्षा जास्त झाले आहेत. गेल्या काही दिवसांपासून टोमॅटो उत्पादक भागात मुसळधार पावसामुळे पुरवठ्यावर परिणाम झाला आहे. पुरवठा वेळेवर न झाल्याने दिल्ली एनसीआरमध्ये टोमॅटोचा तुटवडा निर्माण झाला. याशिवाय पावसामुळे टोमॅटोची नासाडीही वाढत आहे, त्यामुळं दरात वाढ होताना दिसत आहे.

### कमी दरात टोमॅटोची विक्री



दिल्लीसह नोएडा आणि गुरुग्राममध्येही विक्री होणार

ने दिलेल्या माहितीनुसार, टोमॅटो विक्रीचा मेगा सेल २९ जुलै २०२४ पासून सुरू होणार आहे. हळूहळू दिल्ली एनसीआरच्या सर्व भागात टोमॅटोची विक्री सुरु केली जाणार आहे. टोमॅटोची सबसिडी विक्री सध्या कृषी भवन, सीजीओ कॉम्प्लेक्स, लोधी कॉलनी, हौज खास, पार्लमेंट स्ट्रीट, आयएनए मार्केट आणि नोएडा, रोहिणी आणि गुरुग्राममधील अनेक भागात होणार आहे.

या विक्रीच्या मदतीने आम्ही बाजारातील वाढत्या टोमॅटोच्या किमती थांबवू इच्छितो. याशिवाय ग्राहकांनाही फायदा होणार आहे.


ग्राहकांना दिलासा देण्यासाठी ने घेतला निर्णय

एनसीसीएफच्या मते टोमॅटोच्या वाढत्या किमतींमुळे सरकार चिंतेत आहे. ग्राहकांना दिलासा मिळावा यासाठी आम्ही कमी दरात टोमॅटोची विक्री करत असल्याचे ने सांगितले. विविध कारणांमुळं वाढलेल्या किमतींचा दबाव ग्राहकांवर पडू नये, यासाठी आमचा प्रयत्न आहे. गेल्या वर्षी याच काळात टोमॅटोचे भाव १६५ रुपये किलोवर पोहोचले होते. यंदा टोमॅटोचे दर जवळपास निम्मे आहेत.

टोमॅटोबरोबर बटाटे आणि कांद्याच्या किंमतीतही वाढ : टोमॅटोचे भाव वाढण्यास प्रतिकूल हवामान जबाबदार धरले जात आहे. उष्णतेच्या लाटेनंतर झालेल्या मुसळधार पावसामुळे टोमॅटोचे भाव वाढत आहेत. मुसळधार पावसामुळे हिमाचल प्रदेशातून किरकोळ बाजारात टोमॅटोचा पुरवठा विस्कळीत झाला आहे. त्यामुळे टोमॅटोचे भाव झपाट्याने वाढत आहेत. प्रतिकूल हवामानामुळे टोमॅटो व्यतिरिक्त दिल्लीत बटाटे आणि कांद्याच्या किमतीही वाढत आहेत. दरवर्षी या महिन्यांत टोमॅटोच्या दरात वाढ होत असते.

## शेतकऱ्यांनी उत्पादित केलेली सर्व मसूर, उडीद आणि तूर डाळ सरकार खरेदी करणार !

### कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांचे आश्वासन



पुणे : तूर, उडीद आणि मसूर डाळ यांचे संपूर्ण उत्पादन सरकार शेतकऱ्यांकडून खरेदी करेल, असे कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी राज्यसभेत सांगितले. ई-समृद्धी प्लॅटफॉर्मद्वारे सरकार ही खरेदी करेल, असे ते म्हणाले. राज्यसभेत एका पुरवणी प्रश्नाला उत्तर देताना कृषिमंत्री यांनी हे आश्वासन दिलेले आहे.

ते पुढे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकारने शेतकऱ्यांकडून एमएसपी अंतर्गत सर्वाधिक खरेदी केली आहे. मागील यूपीए सरकारच्या आकडेवारीचा संदर्भ देत चौहान म्हणाले की २००३-२००४ आणि २०१३-१४ दरम्यान, किमान आधारभूत किंमत अंतर्गत केवळ ४५ कोटी मेट्रिक टन खरेदी करण्यात आली. सध्याच्या एनडीए सरकारने २०१४-१५ ते २०२३-२४ दरम्यान एकूण ६९.१८ कोटी मेट्रिक टन खरेदी केली आहे. विरोधक राजकारण करत असल्याचा आरोप त्यांनी केला आणि स्वामीनाथन समितीने शेतकऱ्यांना त्यांच्या खर्चावर ५० टक्के नफा देण्याची शिफारस केली होती, परंतु यूपीए सरकारने त्याकडे दुर्लक्ष केले. सध्या बाजारात वेगवेगळ्या डाळींना चांगला भाव मिळत आहे, परंतु शेतकऱ्यांजवळ विकायला डाळ उपलब्ध नाही. केंद्रीय अर्थसंकल्पात (२०२४) अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी डाळ आणि तेलबियांच्या उत्पादनात देशाला स्वयंपूर्ण करण्यावर भर देणार असल्याचे नमूद केले आहे. डाळींचे उत्पादन, साठवण आणि विपणन मजबूत करण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी बजेटमध्ये सांगितले. कृषिमंत्री यांनी डाळींची खरेदी करणार असल्याचे आश्वासन दिले आहे त्यामुळे भविष्यात डाळीला अच्छे दिन येतील असे समजायला हरकत नाही.

## शिळ्या अन्नापासून बायोगॅस निर्मिती; वाया जाणाऱ्या अन्नासाठी उत्तम पर्याय

आपल्या कृषिप्रधान देशात जेवढे जास्त प्रमाणात अन्नधान्य उत्पादन केले जाते, तसेच हे अन्नधान्य वाया जाण्याचे प्रमाण सुद्धा जास्त आहे. विशेषत: शिजवलेले अन्न. रोजचे अन्न असो की मोठमोठे लग्न समारंभ किंवा कार्यक्रमात भरपूर अन्न उरते किंवा नासते. असे अन्न मग कोणाला देण्यात येते किंवा नासले असेल तर फेकण्यात जाते. परंतु जर आम्ही तुम्हाला सांगीतले की या शिळ्या अन्नापासून बायोगॅस निर्मिती करता येते.




चंद्रपूर जिल्ह्यातील गोंडपिपरी येथील कन्यकामाता मंदिरात अनेकांकडून भोजनदान दिले जाते. मात्र तयार केलेले हे अन्न खुपदा मोठ्या प्रमाणात शिल्लक राहते. यावर उपाय म्हणून येथील मंदिर समितीने मंदिर सभागृहाच्या बाजूलाच बायोगॅस प्रकल्प तयार केला आहे. आता याच बायोगॅसच्या माध्यमातून भोजन तयार केले जाते. शिवाय सभागृहात राहणार्या इतरही कर्मचार्यांना याचा लाभ होऊ लागला आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील गोंडपिपरी येथील कन्यकामाता मंदिर सभागृहात दरवर्षीच मोठ्या प्रमाणात कार्यक्रमाचे आयोजन होत असते. मंदिर सभागृह परिसरात मोकळी जागा असल्यामुळे जनावरांचा वावर दिसून येत असतो. दरम्यान, कार्यक्रमातील अनावश्यक आणि नाशवंत अन्न बाहेर फेकल्यांनतर मोकाट गुरांनी ते खाल्ले तर त्यांना विषबाधा होण्याची शक्यता असते. म्हणून मंदिर प्रशासनाने शिळ्या अन्नापासून बायोगॅस निर्मिती करण्यास सुरवात केली आहे. या सभागृहात अनेक कार्यक्रम पार पडतात; मात्र हे कार्यक्रम संपन्न झाल्यावर जेवणावळीनंतर शिल्लक अन्नाची विल्हेवाट आता बायोगॅसच्या माध्यमातून लावली जात आहे. शिळ्या अन्नापासून जनावरांना विषबाधा होऊ नये. सभागृह परिसरात दुर्गंधी पसरू नये, नागरिकांच्या आरोग्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून पाच वर्षापासून बायोगॅसचा वापर सुरू आहे. सभागृहात काम करणारे कर्मचारी व पुजारी बायोगॅसचा वापर करून स्वयंपाक बनवतात. आपल्या देशात लग्नसमारंभ आणि विविध कार्यक्रमात जेवणाच्या पंगतीत भरपूर अन्न उरते . त्यामुळे या पद्धतीचा वापर केल्यास अन्न वाया तर जाणार नाहीच शिवाय परिसर सुद्धा स्वच्छ राहील. त्यामुळे प्रत्येक गावात आणि शहरात या पर्यायाचा अवलंब करण्याचा विचार करण्यास हरकत नाही.

# योग्य पद्धतीने करा विद्राव्य खतांचा वापर

पिकांचे अधिक उत्पादन घेण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या सर्व निविष्ठांमध्ये पाणी आणि खते या दोन अत्यंत महत्त्वाच्या निविष्ठा आहेत. दोन्ही निविष्ठांचा पारंपारिक पद्धतीने वापर करीत असताना त्याची कार्यक्षमता फक्त ३० ते ४० टक्के मिळते. दोन्ही निविष्ठांचा ठिबक सिंचन पद्धतीमधून वापर केल्याने त्यांची कार्यक्षमता ८० ते ९० टक्के मिळते. त्यामुळे पिकाचे अधिक उत्पादन तर मिळतेच आणि उच्चतम गुणवत्ता मिळते. त्याच बरोबर दोन्ही निविष्ठांच्या वापरामध्ये अनुक्रमे ५० ते ६० आणि २५ ते ३० टक्के बचत होऊन खर्चामध्ये बचत होते.

विद्राव्य खतांच्या मात्रा ठरविण्यापूर्वी माती परीक्षण होणे आवश्यक आहे. आपल्या जमिनीचा सामू, विद्युत वाहकता तसेच जमिनीत उपलब्ध नत्र, स्फुरद, पालाश, सूक्ष्म अन्नद्रव्ये किती आहेत हे लक्षात येते. त्यानुसार विद्राव्य खतांची मात्रा ठरविता येते. विद्राव्य खतांचा वापर शिफारशीनुसार आवश्यक आहे. जमिनीत निंबोळी पेंड, शेणखत आणि गांडूळ खताचा वापर करावा. फर्टिगेशनमध्ये अन्नद्रव्यांची मात्रा ठरवताना माती परिक्षणाचा अहवाल तपासावा. आपणास किती टन किंवा क्विंटल पीक उत्पादन घ्यावयाचे आहे आणि त्यासाठी किती अन्नद्रव्ये पिके जमिनीतून शोषण करतात यानुसार किंवा स्थानिक कृषी विद्यापीठाच्या संबंधित पिकाच्या शिफारशीनुसार अन्नद्रव्यांची मात्रा ठरवावी. फर्टिगेशन करत असताना पिकाच्या अवस्थेनुसार त्वरित बदल करावेत.

फर्टिगेशन तंत्राचा वापर : फर्टिगेशन तंत्रामुळे २५ ते ३० टक्के रासायनिक खतांच्या वापरामध्ये बचत होते. पाण्यात विरघळणारी खते ठिबक सिंचनासोबत वापरल्यास खत वापर कार्यक्षमता ८० टक्क्यांपेक्षा अधिक मिळते. राज्यात द्राक्ष,



हरितगृहातील गुलाब, कार्नेशन, जरबेरा, टोमॅटो, ढोबळी मिरचीसाठी पूर्णपणे फर्टिगेशनचा वापर होत आहे. तर डाळिंब, केळी, मोसंबी, संत्रा, पेरू, पपई, ऊस, कापूस पिकांसाठी निम्मे पारंपरिक आणि निम्मे विद्राव्य खतांचा वापर शेतकरी करीत आहे. ठिबकने पाणी देताना पाण्यात विरघळणारी खते दिली पाहिजेत. ठिबक सिंचन हे केवळ फक्त पाणी देण्यासाठी नाही हे लक्षात घेतले पाहिजे.

आवश्यक अन्नद्रव्ये : मुख्य अन्नद्रव्ये - कार्बन, हायड्रोजन, ऑक्सिजन, नत्र, स्फुरद, पालाश.

दुय्यम अन्नद्रव्ये - कॅल्शिअम, मॅग्नेशिअम, सल्फर. सूक्ष्म अन्नद्रव्ये - कॉपर, मँगेनीज, झिंक, लोह, बोरॉन,क्लोरिन, मॉलिब्डेनम, सिलिकॉन

विद्राव्य खताचे फायदे - १०० टक्के पाण्यात विद्राव्य असल्यामुळे आणि त्यातील अन्नद्रव्ये उपलब्ध स्वरूपात असल्यामुळे पिकांस लगेच उपलब्ध होतात. निर्यातक्षम गुणवत्तेचे अधिक उत्पादन मिळते. पिकांना पाणी आणि अन्नद्रव्यांचा नियमित पुरवठा होत असल्यामुळे उत्पादनात भरीव वाढ होते. पिकांच्या गरजेनुसार व अवस्थेनुसार दररोज अथवा दिवसाआड देता येतात. थेट पिकांच्या मुळांच्या कक्षेत दिली जातात, ती मुळांना त्वरित उपलब्ध होतात. खते सौम्य द्रावणातून दिली जात असल्यामुळे मुळावर अनिष्ट परिणाम होत नाही. खते देण्याची पद्धत अतिशय सोपी असल्यामुळे वेळ, मजूर, खर्च, ऊर्जा, यंत्रसामग्रीची बचत होते. खते रोज कमी मात्रेत दिली जात असल्यामुळे अन्नद्रव्ये निचऱ्यावाटे, स्थिरीकरणाद्वारे वाया जात नाहीत. खते आम्लधर्मीय असल्यामुळे जमिनीचा सामू नियंत्रण करण्यास मदत होते. ठिबक संचात क्षार साचत नाहीत. ड्रीपर्स बंद पडत नाहीत. खतांच्या मात्रेमध्ये २५ टक्के बचत होते. सोडियम क्लोराइड्स सारख्या हानिकारक मुलद्रव्यापासून मुक्त असल्यामुळे जमिनीच्या पोताचा ऱ्हास होत नाही. तसेच उत्पादनाची गुणवत्ता अप्रतिम राहते. खते फवारणीसाठी वापरता येऊ शकतात. हलक्या जमिनीतही फर्टिगेशनद्वारे अधिक उत्पादन मिळविणे शक्य होते.

विद्राव्य खते द्यायची साधने : ठिबक सिंचन पद्धतीमध्ये व्हेंचुरी किंवा फर्टिलायझर टँक किंवा इंजेक्शन पंपाव्दारे विद्राव्य खतांचा वापर करता येतो.

व्हेंचुरी : हे पाण्याचा दाबामधील फरकावर चालणारे साधन आहे. व्हेंचुरीद्वारे विद्राव्य खते पाण्याच्या प्रवाहाबरोबर झाडांच्या मुळांच्या कक्षेत दिली जातात. व्हेंच्युरीच्या शोषणाचा दर १२० ते १५०० लिटर प्रती तास असतो. मुख्य वाहिनीवरील व्हॉल्व्हद्वारे कमी जास्त करता येतो. व्हेंचुरी १.०, १.५, २.०, २.५ इंच आकारामध्ये उपलब्ध आहेत.

फर्टिलायझर टँक : ही एक स्टीलची टाकी किंवा एचडीपीई प्लॅस्टिकची असून मुख्य जलवाहिनीस इनलेट व आऊटलेट जोडलेले असते. खतांचे प्रमाण सिंचनाबरोबरच पिकांना दिले जाते. टँक ३०, ६०, ९०, १२०, १६० लिटरमध्ये उपलब्ध आहेत. फवारणी करताना काळजी : पिकास कोणत्या अन्नद्रव्यांची उणीव आहे, अशाच विद्राव्य खतांची निवड करून त्याची फवारणी करावी. उत्तम वाढीसाठी १९:१९:१९ विद्राव्य खताची फवारणी करावी. फुले भरपूर येण्याकरिता १३:४०:१३ ची फवारणी करावी, फळांची, बोंडांची चांगली वाढ होण्यासाठी ०:५२:३४ ची फवारणी करावी. फळे, बोंडे परिपक्व होताना १३:०:४५ ची फवारणी करावी.




### महत्वाच्या घटना

१६७७ : शिवाजीमहाराज तामिळनाडूतील विरुधाचलम येथे देवदर्शनास गेले. तिथे त्यांनी डच प्रतिनिधींशी बोलणी केली.
१७९० : अमेरिकेत पहिली जनगणना सुरू झाली.
१८२० : जॉन टिंडाल ब्रिटिश भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: ४ डिसेंबर १८९३)
१८३५ : अलीशा ग्रे वेस्टर्न इलेक्ट्रिक कंपनीचे एक संस्थापक (मृत्यू: २१ जानेवारी १९०१)
१८६१ : आचार्य प्रफुल्लचंद्र रे भारतीय रसायनशास्त्रज्ञ, देशातील वैज्ञानिक चळवळीचे प्रणेते, त्यांनी 'बेंगॉल केमिकल्स अँड फार्मास्युटिकल्स' ही कंपनी काढली. १८९६ मधे त्यांनी पारा आणि नायट्रोजन यांच्या संयोग करुन मर्क्युरस नायट्रेटची निर्मिती केली. त्यांना 'मास्टर ऑफ नायट्रेटस' म्हणत असत. (मृत्यू: १६ जून १९४४)
१८७० : जगातील पहिल्या भूमिगत ट्यूब रेल्वेची टॉवर सबवे ची लंडन मध्ये सुरवात झाली.
१८७६ : पिंगाली वेंकय्या भारतीय तिरंग्याचा रचनाकार (मृत्यू: ४ जुलै १९६३)
१९१० : पुरुषोत्तम शिवराम रेगे कादंबरीकार, नाटककार, कवी आणि समीक्षक (मृत्यू: १७ फेब्रुवारी १९७८)
१९१८ : दादा जे. पी. वासवानी आध्यात्मिक गुरू, सिंधी धर्मीयांतील गुरुतुल्य व्यक्तिमत्त्व, साधू वासवानी यांचे पुतणे व शिष्य
१९२३ : काल्व्हिन कूलिज अमेरिकेचे ३० वे राष्ट्राध्यक्ष बनले. हे अतिशय मोजके बोलण्यासाठी प्रसिद्ध होते.
१९४१ : ज्यूल्स हॉफमन नोबेल पारितोषिक विजेते फ्रेन्च जीवशास्त्रज्ञ
१९५४ : दादरा व नगर हवेली हा प्रांत भारतीयांनी पोर्तुगीजांकडुन ताब्यात घेतला.
१९७९ : नगर जिल्ह्यातील डॉ. रजनीकांत आरोळे व त्यांच्या पत्नीला मॅगसेसे पुरस्कार जाहीर केला.
१९९० : इराकने कुवेतवर आक्रमण केले.
१९९६ : अटलांटा ऑलिंपिक स्पर्धेत अमेरिकेच्या मायकेल जॉन्सनने दोनशे आणि चारशे मीटरच्या शर्यतीत, एकाच ऑलिंपिक स्पर्धेत सुवर्णपदके पटकावून ऑलिंपिकच्या इतिहासातील पहिला खेळाडू होण्याचा मान पटकवला.
२००१ : ऑल इंग्लंड बॅडमिंटन स्पर्धेतील विजेता पुल्लेला गोपीचंद याची भारतीय क्रीडाक्षेत्रातील सर्वाधिक प्रतिष्ठेच्या राजीव गांधी खेल रत्न पुरस्कारासाठी निवड.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८२० : जॉन टिंडाल ब्रिटिश भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: ४ डिसेंबर १८९३)
१८३४ : स्टॅच्यू ऑफ लिबर्टी चे रचनाकार फ्रेडेरीक ऑगस्टे बर्थोल्ड यांचा जन्म. (मृत्यू: ४ ऑक्टोबर १९०४)
१८३५ : अलीशा ग्रे वेस्टर्न इलेक्ट्रिक कंपनीचे एक संस्थापक (मृत्यू: २१ जानेवारी १९०१)
१८६१ : आचार्य प्रफुल्लचंद्र रे भारतीय रसायनशास्त्रज्ञ, देशातील वैज्ञानिक चळवळीचे प्रणेते, त्यांनी 'बेंगॉल केमिकल्स अँड फार्मास्युटिकल्स' ही कंपनी काढली. १८९६ मधे त्यांनी पारा आणि नायट्रोजन यांच्या संयोग करुन मर्क्युरस नायट्रेटची निर्मिती केली. त्यांना 'मास्टर ऑफ नायट्रेटस' म्हणत असत. (मृत्यू: १६ जून १९४४)
१८७६ : पिंगाली वेंकय्या भारतीय तिरंग्याचा रचनाकार (मृत्यू: ४ जुलै १९६३)
१८७७ : भारतीय वकील आणि राजकारणी रविशंकर शुक्ला यांचा जन्म. (मृत्यू: ३१ डिसेंबर १९६५)
१८९२ : वॉर्नर ब्रदर्स चे सहसंस्थापक जॅक एल. वॉर्नर यांचा जन्म. (मृत्यू: ९ सप्टेंबर १९७८)
१९१० : पुरुषोत्तम शिवराम रेगे कादंबरीकार, नाटककार, कवी आणि समीक्षक (मृत्यू: १७ फेब्रुवारी १९७८)
१९१८ : दादा जे. पी. वासवानी आध्यात्मिक गुरू, सिंधी धर्मीयांतील गुरुतुल्य व्यक्तिमत्त्व, साधू वासवानी यांचे पुतणे व शिष्य
१९२९ : भारतीय राजकारणी विद्याचरणा शुक्ला यांचा जन्म. (मृत्यू: ११ जुन २०१३)
१९२२ : पद्मभूषण पुरस्कार सन्मानित भारतीय उद्योगपती जी. पी. बिरला उर्फ गंगाप्रसाद बिरला यांचा जन्मदिन.
१९३२ : अमेरिकन फुटबॉल लीग आणि वर्ल्ड चॅम्पियनशिप टेनिसचे सहसंस्थापक लमेर हंट यांचा जन्म. (मृत्यू: १३ डिसेंबर २०१६)
१९४१ : ज्यूल्स हॉफमन नोबेल पारितोषिक विजेते फ्रेन्च जीवशास्त्रज्ञ
१९४५ : भारतीय शिक्षक आणि कार्यकर्ते बंकर रॉय यांचा जन्म.
१९५६ : गुजरात राज्याचे राजकारणी व विद्यमान मुख्यमंत्री विजय रूपाणी यांचा जन्मदिन.
१९५८ : अर्शद अयुब भारतीय क्रिकेटपटू आणि व्यवस्थापक

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५८९ : हेन्री (तिसरा) फ्रान्सचा राजा (जन्म: १९ सप्टेंबर १५५१)
१७८१ : सखारामबापू बोकील पेशवाईतील मुत्सद्दी, साडेनीन शहाण्यांपैकी एक पूर्ण शहाणे (जन्म:)
१९२२ : अलेक्झांडर ग्रॅहम बेल स्कॉटिश अमेरिकन पदार्थ वैज्ञानिक, टेलिफोनचा संशोधक (जन्म: ३ मार्च १८४७)
१९३४ : पॉल फॉन हिन्डेनबर्ग जर्मनीचे दुसरे राष्ट्राध्यक्ष (जन्म: २ आक्टोबर १८४७)
१९७९ : भारतीय हिंदी चित्रपट अभिनेते व गायक करन दिवाण यांचे निधन.
१९७८ : मोनॅको ग्रांप्री चे स्थापक अ‍ॅन्टोनी नोगेस यांचे निधन. (जन्म: १३ सप्टेंबर १८९०)
१९८० : पद्मभूषण पुरस्कार सन्मानित भारतीय शिल्पकलेचे प्रणेते भारतीय शिल्पकार आणि चित्रकार रामकिंकर बैज यांचे निधन.
२०१० : भारतीय हिंदी, पंजाबी आणि गुजराती भाषिक चित्रपटांमध्ये काम करणारे अभिनेते व चित्रपट निर्माता कमल कपूर यांचे निधन.

# अण्णाभाऊ साठेंच्या साहित्यांची हत्तीवरुन मिरवणूक

अजिंक्य चांदणे यांच्या संकल्पनेतून साहीत्य सम्राट गौरव महोत्सव | निळे फेटे बांधून अन्? पांढरे वस्त्र परिधान करुन महिला, पुरुष सहभागी | बीडच्या साहित्य सम्राट गौरव महोत्सवाने राज्याला आदर्श घालून दिला





बीड/प्रतिनिधी

बीडच्या साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे महोत्सवाने राज्याला एक वेगळा आदर्श निर्माण करून दिला आहे. त्या अनुषंगाने बीडमध्ये साहित्य सम्राट गौरव महोत्सव विविध उपक्रम राबवून साजरा करण्यात येतो. अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन करण्यासाठी गुरुवार (दि.१) ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याची हत्तीवरुन मिरवणूक काढण्यात आली. हजारो महिला, पुरुष निळे फेटे बांधून साहित्य दिंडीत सहभागी झाले होते. त्यामुळे एक आगळीवेगळी जयंती बीडच्या नागरिकांनी अनुभवली होती. सायंकाळी ४ वाजता अण्णाभाऊंच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली. दरम्यान सार्वजनिक जयंती उत्सव समिचे समन्वयक अजिंक्य चांदणे यांच्या संकल्पनेतून हा महोत्सव साजरा झाला.

बीडमध्ये २९ जुलै ते १ ऑगस्ट या कालावधीत साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त साहित्य सम्राट गौरव महोत्सव पार पडला.त्यामध्ये बिंदुसरा नदीत वर्गणीतुन स्वच्छता मोहीम, गायरानधारक शेतकऱ्यांना फवारणी पंप, पाचशे महिलांना साड्या, तीनशे विद्यार्थ्यांना दप्तर वाटप, व्याख्याने असे कार्यक्रम राबवून जयंती साजरी करण्यात आली. अजिंक्य चांदणे यांच्या संकल्पनेतून हा साहित्य सम्राट गौरव महोत्सव साजरा करण्यात आला होता. दरम्यान अण्णाभाऊंच्या साहित्यांची काळा हनुमान ठाणा ते अण्णाभाऊ साठे पुतळा इथपर्यंत हत्तीवरुन मिरवणूक आणि अभिवादन रॅलीत काढण्यात आली होती. त्या रॅलीत जयंती उत्सव समितीचे समन्वयक अजिंक्य चांदणे, उत्सव समिती अध्यक्ष सुशीला मोराळे,आ.संदिप क्षीरसागर, ऍड. अविनाश गंडले, डॉ.सतीष सांळुके, माजी आ.सय्यद सलीम, शेख निजाम, शेख शफीक भाऊ, योगेश क्षीरसागर, दादासाहेब मुंडे, सुभाष लोणके, बाळासाहेब पौळ, ऍड.सचिन थोरात, यांच्यासह आदी आंबेडकरी जनता मोठ्या संख्येने सहभागी झाली होती.

### अशी निघाली मिरवणूक

साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेची भव्य अशी मिरवणूक काळा हनुमान ठाणा ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा मार्ग साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे चौक इथपर्यंत काढण्यात आली होती. या मिरवणुकीत साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. महिला, पुरुष, बालके या मिरवणुकीत मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### अभिवादन सभेत रॅलीची सांगता

साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त गुरुवारी काळा हनुमान ठाणा ते साठे चौक इथपर्यंत हत्तीवरून साहित्य दिंडी काढण्यात आली. दिंडीत सहभागी झालेल्या हजारो अण्णाभाऊ साठे अनुयायांनी त्यांना अभिवादन केले. त्यानंतर अभिवादन सभा संपन्न झाली. या अभिवादन सभेला सर्व क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून अण्णाभाऊ साठे यांच्या कार्यावर प्रकाश टाकला.

## गायरानधारक शेतकऱ्यांना फवारणी पंपाचे वाटप



बीड प्रतिनिधी

साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त बीडमध्ये साहित्यसम्राट गौरव महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवाचे समन्वयक अजिंक्य चांदणे, उत्सव समिती अध्यक्ष सुशिलाताई मोराळे असून अवघ्या महाराष्ट्र राज्याला आदर्श निर्माण करून देईल, असा महोत्सव विविध उपक्रमातून साजरा केला जात आहे. काल मंगळवार ३० जुलै रोजी बीड शहरासह जिल्हाभरातील गायरानधारक शेतकऱ्यांना बीड शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या वतीने फवारणी पंपाचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी अनिल जगताप तथा सचिन मुळूक यांनी साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून वंदन केले. याबरोबरच अनिलदादा जगताप तथा सचिन मुळूक यांनी उपस्थित गायरानधारक शेतकऱ्यांशी मुक्तसंवाद साधला, त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. लवकरच आम्ही महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांची भेट घेऊन गायरानधारक शेतकऱ्यांच्या समस्यांबाबत चर्चा करणार आहोत. त्यांना याबाबत निवेदन देखील देण्यात येणार असल्याचे उपस्थित शेतकरी बांधवांना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप तथा सचिनभैय्या मुळूक यांनी आश्वासन दिले. दरम्यान किशोर जगताप माजी जिल्हा परिषद सदस्य, गायरानधारक शेतकरी, महिला आणि शिवसेना पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

## अण्णाभाऊ साठे यांनी उपेक्षितांच्या व्यथा साहित्यातून मांडण्याचे काम केले: कागदे



बीड/प्रतिनिधी

साहित्यसम्राट, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त रिपाइंच्यावतीने युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा अनु.जाती जमाती संघर्ष समितीचे अध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून अभिवादन रॅली व क्रांती मशाल रॅली काढून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन करण्यात आले. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे वारसदार होते. फकीरा ही कादंबरी त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना समर्पित करून म्हणाले की, जग बदल घालून घाव मज सांगून गेले भीमराव या म्हणी प्रमाणे ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना गुरुस्थानी माणिक होते. वास्तववादी साहित्य निर्माण करणारे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या हयातीत १५ कथासंग्रह व ३५ कादंबऱ्या, पटकथा, नाटके, पोवाडे यांच्या माध्यमातून साहित्याचा डोंगर उभा केला. त्यांच्या फकीरा कादंबरीला राज्य सरकारकडून १९६१साली उत्कृष्ट कादंबरीचा पुरस्कार मिळाला. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात एक प्रेरणा देणारी लावणी म्हणजे माझी मैना गावाकडे राहिली माझ्या जीवाची होतीया काहिली, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांनी उपेक्षितांच्या व्यथा व दु:खाला जगासमोर मांडून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी निर्माण केलेले साहित्य आजच्या तरुण पिढीने आत्मसात करून इतरांना वाचण्यासाठी प्रवर्त केले तर अण्णाभाऊ साठे यांना खरे अभिवादन ठरेल. असे प्रतिपादन युवा रिपाइं प्रदेश अध्यक्ष पप्पू कागदे यांनी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती प्रसंगी केले. यावेळी राजू जोगदंड,डॉ.लक्ष्मण जाधव, प्रकाश कानगावकर, किसन तांगडे, रामसिंग टाक, दादा हातागळे, सत्यपाल लाहोट, मायाताई मिसळे, शफिक भाऊ शेख, जावेद कुरेशी,अमृत काका सारडा, आसाराम गायकवाड, डॉ. सतीश साळुंके, भगवान कांडेकर, शुभम दूध, संतोष जाधव, अजय सवाई, जयदीप सवाई,बापू पवार,महेश आठवले, अविनाश जोगदंड, विलास जोगदंड,शितल कुमार सुकाळे , सुभाष तांगडे, भाऊसाहेब दळवी, भैय्या मस्के, गणेश वाघमारे, भैया साळवे, रतन वाघमारे, नामदेव वाघमारे, महेंद्र वडमारे,अक्षय कोकाटे,अप्पा मिसळे, भारत कांबळे,श्याम वीर,श्रीकांत साबळे, रणजीत, शिंनगारे, सोनू वडमारे,सनी जोगदंड, गौतम कांबळे, आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आयोजक प्रभाकर चांदणे व दिलीप खंदारे यांनी परिश्रम घेतले.

# जिल्ह्यात ठिकठिकाणी अण्णाभाऊ साठे जयंती व टिळक पुण्यतिथी साजरी



### माऊली विद्यालयात

बीड: माऊली विद्यापीठ केज संचलित माऊली प्राथमिक विद्यालय व आदर्श बालवाडी मध्ये साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक पुण्यतिथी निमित्त कार्यक्रम संप्पन्न झाला.कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रतिमा पूजन करून अभिवादन करण्यात आले.प्रसंगी अनेक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. शाळेचे मुख्याध्यापक संतोष माने यांनी आपल्या मनोगतातून त्यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन इ.७ वी च्या विद्यार्थिनी अनगता सुरवसे व रचना कोटूळे यांनी केले.कार्यक्रमासाठी सर्व सहशिक्षक व विद्यार्थी यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रीय गीताने करण्यात आली.

### सरस्वती विद्यामंदिर शाळा

बीड : शहरातील धानोरा रोड , शिवाजीनगर येथील सरस्वती विद्यामंदिर शाळेत साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती व



लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. शाळेच्या प्रांगणात पार पडलेल्या या कार्यक्रमाप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना इयत्ता आठवीतील विद्यार्थिनी अक्षता शिंदे म्हणाली की, अण्णाभाऊंच्या साहित्यामुळे मराठी साहित्य खऱ्या अर्थाने समृद्ध झाले आहे. स्वातंत्र्यानंतरही सर्वांना शिक्षण मिळत नव्हते , लग्न मंडपाबाहेर पडलेल्या पत्रावळीवर काही उष्टे खरकटे आहे का ते खाण्यासाठी धडपडणाऱ्या लोकांना पाहून अण्णाभाऊंनी सरकारला जागृत करण्यासाठी मोठ्या प्रमाणात लिखाण केले. भारतातील कष्टकऱ्यांची अवस्था पाहून अण्णाभाऊ म्हणतात की पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरलेली नसून ती कष्टकऱ्यांच्या तळहातावर तरलेली आहे. जग बदल घालूनी घाव मज सांगून गेले भीमराव असे लिहून अण्णाभाऊंनी आपल्या साहित्यातून सामाजिक क्रांती घडवून आणण्याचे कार्य केले. असेही अक्षता शिंदे म्हणाली. गोल्हार आदित्य , स्नेहल डोळस , मयुरी गुरव , श्रुती बांड , समीक्षा डोळस या विद्यार्थ्यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षक डी. एफ ढोरमारे यांनी केले तर आभार प्रदर्शन सहशिक्षिका वर्षा डोळस यांनी केले.

### राष्ट्रीय माध्यमिक विद्यालयात

प्रियदर्शनी प्राथमिक विद्यालय बीड व राष्ट्रीय माध्यमिक विद्यालय बीड येथे लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य श्री. चौधरी आर.बी. हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती येवले ए. बी. व प्रियदर्शनी प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. पाटील ए. आय. हे होते. कार्यक्रमाची सुरुवात लोकमान्य बाळ गंगाधर



टिळक व साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

शाळेतील विद्यार्थ्यांनी लोकमान्य टिळक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे जीवन व कार्य यावर भाषणे केली. त्यानंतर कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या श्रीमती येवले ए. बी. यांनी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या बद्दल विचार व्यक्त केले. अध्यक्षिय समारोप प्रसंगी प्राचार्य श्री. चौधरी आर. बी. म्हणाले की व्यक्तीमध्ये एखाद्या गोष्टीची जिज्ञासा निर्माण झाली की तो प्राप्त करण्याचा निश्चितच प्रयत्न करतो. जरी आण्णाभाऊ दीड दिवस शाळेत गेले असले तरी त्यांना शिकण्याची आवड होती. त्यांनी अनेक कादंबरी, कथा लिहिल्या . छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर पोवाडा रचला. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्यानंतरच्या काळात लोकगीत, पोवाडे लावण्याच्या माध्यमातून सामान्य लोकांमध्ये लोकजागृती केली. स्वातंत्र्यपूर्वकाळात लोकांची एकी व्हावी यासाठी लोकमान्य टिळक यांनी शिवजयंती व श्री गणेश उत्सव सुरू केले. मराठा व केसरी वृत्तपत्राद्वारे लोकांमध्ये स्वातंत्र्या विषयी जागृती निर्माण केली.या कार्यक्रमाचे संचालन व आभार जाधव यांनी केले. या कार्यक्रमास शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित.

### सुकळी येथे अभिवादन

युसूफवडगांव/प्रतिनिधी:- केज तालुक्यातील सुकळी येथील सामाजिक कार्यकर्ते कैलास जावळे यांनी माळेगाव हायस्कुल येथील विद्यार्थ्यांना लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त शालेय साहित्य वाटप करत अभिवादन केले.

गत पाच वर्षापासून सुकळी येथील सामाजिक कार्यकर्ते कैलास जावळे हे महापुरुषांच्या विचारांना अनुसार अशी जयंती साजरी करतात यावेळी सुद्धा त्यांनी तीच सामाजिक बांधिलकी जोपासत साहित्यरत्न लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त त्यांनी सुकळी येथील शिवारात असणाऱ्या माळेगाव हायस्कुल माळेगाव मधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करत महापुरूषांच्या विचारांना अभिप्रेत अशी अण्णाभाऊ साठे जयंती



साजरी करत त्यांना अभिवादन केले.यावेळी मुख्यध्यापक एस.एम लोकरे,शिक्षक कर्मचारी ए.एस जाधव,एस.आर सारूक,एस.बी गुजर,एम.एम लामतुरे,एम.एस फुंदे,जी.जे कदम,डि.वाय नागरगोजे,बी.बी भोसले,ए.डी इतापे,पत्रकार सचिन उजगरे व विद्यार्थी उपस्थित होते.

### पीव्हीपी महाविद्यालय

पाटोदा : पाटोदा येथील नवगण शिक्षण संस्था संचालित पी.व्ही.पी औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाच्या वतीने लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्त महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. तांदळे संदीप यांनी पुष्पहार अर्पण करून प्रतिमेस अभिवादन केले, यावेळी उपस्थित कर्मचारी



. प्रा. पठाण ए.के., प्रा. सयद टी.क्यू. प्रा.घुमरे व्ही.एस., प्रा.बहिर एस. एम, प्रा.बासद टी.एच., प्रा.क्षीरसागर.के.आर.आणि सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी जाधव एस. ए., साळुंके एन.आर., सरवदे ए.एस., बहीर एस. व्ही , शेकडे के. एस , शिंदे व्ही.एस.,वाघ बी.ए., गाडे.एम.एस. या सर्वांनी आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेस अभिवादन केले.

### युसूफवडगांव येथे साठे जयंती

युसूफवडगांव/प्रतिनिधी:- केज तालुक्यातील युसूफवडगांव येथे आज साहित्यरत्न लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त अभिवादन करून जयंती उत्साहात साजरी केली.



साहित्यरत्न लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त आज साठे चौकामध्ये अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेसह डॉ.बाबासाहेब आंबेडकर,महात्मा बसेश्वर महाराज,वस्ताद लहुजी साळवे व छत्रपती शिवाजी महाराज या सर्व महापुरूषांच्या प्रतिमांचे पुजन करून अभिवादन करण्यात आले यावेळी उपसरपंच महेश लामतुरे,मन्मथ पाटील,किरण सातपुते,चंद्रकांत भुसारी,काशीनाथ खरबड,बाळु राऊत,ज्योतीराम सावंत,पत्रकार सचिन उजगरे, वैरागे,राजु गायकेसोमनाथ,अरुण राऊत,शिवहार थळकरी,जनक राऊत,अनिल उजगरे,नागनाथ मुकदम,आकाश वैरागे प्रवीण वैरागे,अक्षय वैरागे,पंकज वैरागे,संजय जाधव,ओम वैरागे यांच्या सह जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष,उपाध्यक्ष,सचिव इतर पदाधिकारी व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जाहिर प्रगटन

**मा.श्री ओ.एन. मंत्री साहेब, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज १०७४/२०२४**

**सुनिता मोहनराव शिंदे व ईतर विरूध्द निरंक**

**अर्जदार : १. सुनिता भ्र. मोहनराव शिंदे, रा. पालवन चौक, धानोरा रोड, बीड, ता.जि. बीड., २. जितेश पि. मोहनराव शिंदे, रा. वरील प्रमाणे, ३. उमेश पि. मोहनराव शिंदे, रा. वरील प्रमाणे, ४. शितल भ्र. गोविंद घाडगे, रा. साईबाबा चौक, मंगळवार पेठ, हावळे गल्ली, अंबाजोगाई**

**विरुध्द निरंक**

मागणी- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत मोहनराव पि. धोंडीराम शिंदे यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. ज्याअर्थी मयत मोहनराव पि. धोंडीराम शिंदे यांचा मृत्यु दिनांक १८/०८/२०२१ रोजी झाला आहे. यांचे मृत्यु वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत मोहनराव पि. धोंडीराम शिंदे यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत मोहनराव पि. धोंडीराम शिंदे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. **आज दिनांक २५/०७/२०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ३१/०८/२०२४ आहे.**

ॲड. फाटक व्ही. एस.

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व. स्तर, बीड.

# आष्टी मतदार संघासाठी नऊ सबस्टेशन,सात ट्रान्सफॉर्मर

## आष्टी येथे ५० चे ट्रांसफार्मर व ६५२ डीपीना मंजुरी

आष्टी प्रतिनिधी

आष्टी पाटोदा शिरूर मतदारसंघांमध्ये अनेक दिवसापासून विजेचा प्रश्न शेतकऱ्यांना भेडसावत होता शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन आपण राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडवणीस व पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्याकडे नवीन सब स्टेशन व आष्टी येथे ५० केवीचे ट्रांसफार्मर साठी काही दिवसांपूर्वी मागणी केली होती त्या मागणीचा विचार करून आष्टी मतदार संघासाठी ऊर्जा विभागाकडून सुधारित वितरण क्षेत्र अंतर्गत (आर डी एस एस )मोठ्या प्रमाणात नवीन सब स्टेशन सह इतर मागण्या मंजूर केल्याबद्दल मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या वतीने महायुती सरकारचे आभार व्यक्त करतो आपण मागणी केलेल्या सर्व बाबींनामंजुरी दिल्यामुळे आष्टी पाटोदा शिरूर तालुक्यातील विजेता प्रश्न सुटण्यास मदत होणार असल्याचेही यावेळी बोलताना आमदार बाळासाहेब आजबे यांनी सांगितले



आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे कर्तव्यदक्ष आमदार बाळासाहेब आजबे काका यांच्या प्रयत्नातून आष्टी पाटोदा व शिरूर तालुक्यासाठी सुधारित वितरण क्षेत्र अंतर्गत (आर डी एस एस अंतर्गत )०९ नवीन ३३/ ११ चे सब स्टेशनला मंजुरी मिळाली आहे त्याचबरोबर सात अतिरिक्त भार असलेल्या ठिकाणी ५ चे ट्रान्सफॉर्मर मंजूर झाले आहेत आष्टी येथे ५० चे ट्रान्सफार्मर व मागणी केल्याप्रमाणे तिन्ही तालुक्यातील गावांमध्ये ६५२ डीपींना मंजुरी देण्यात आली आहे, नवीन ३३/ ११ सब स्टेशनला मंजुरी मिळालेले गावे पुढील प्रमाणे दादेगाव, पारोडी, धनगर जवळका, पारगाव घुमरा, शिरूर कासार, बीडसांगवी ,कोयाळ, आंभोरा, मातकुळी या ठिकाणी नवीन सबस्टेशन तर अतिरिक्त भार असलेले पोखरी धानोरा दौलावडगाव रोहतवाडी कोतन व कुसलंब या ठिकाणी ५ चे नवीन ट्रान्सफॉर्मर ला मंजुरी देण्यात आली आहे तर शेतकऱ्यांसाठी आष्टी तालुक्यात २७१,पाटोदा तालुका १४४ व शिरूर तालुक्यासाठी २३७ आशा ६५२ नवीन विद्युत रोहित्र मंजुरी देण्यात आली आहे. पुढे बोलताना आमदार बाळासाहेब आजबे म्हणाले की गेल्या दोन महिन्यापूर्वी आपण राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्रजी फडवणीस व कृषी मंत्री तथा पालकमंत्री धनंजय मुंडे साहेब यांच्याकडे शेतकऱ्यांकडून आलेल्या मागणीनुसार व तालुक्यातील विजेचा तुटवडा लक्षात घेत वरील बाबींची मागणी केली होती त्या सर्व बाबीचा विचार करून महायुती सरकारने सर्व मागण्यांना मंजुरी दिल्यामुळे आष्टी तालुक्यातील विजेचा प्रश्न सुटणार आहे त्यामुळे शेतकऱ्यांना मुबलक प्रमाणात विज मिळण्यास मदत होणार असून शेतकरी वर्गामध्ये ही समाधान व्यक्त केले जात आहे, आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातील शेतकऱ्यांच्या वतीने राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्रजी फडणवीस व पालकमंत्री धनंजय मुंडे साहेब यांचे आभार व्यक्त करतो व यापुढेही ऊर्जा विभागाच्या वतीने ज्या गोष्टींची आवश्यकता असेल त्या गोष्टी आपण मंजूर करून आणू ऊर्जा विभागाअंतर्गत पाटोदा येथेही उच्च दाब ट्रान्सफॉर्मर वाढवणे साठी मंजुरी मिळालेली आहे शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा विषय असल्यामुळे आपण इतर बाबींना दुय्यम स्थान देऊन ऊर्जा विभागातील जे प्रश्न आहेत ते प्रश्न सोडवण्यासाठी पालकमंत्री धनंजय मुंडे साहेब यांच्याकडे आग्रह धरला होता त्यामुळे ऊर्जामंत्री देवेंद्र फडणीस व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी या सर्व मागण्या मान्य केल्या आष्टी मतदारसंघाला झुकते माप दिल्याबद्दल पुनश्च एकदा अभिनंदन करून आभार व्यक्त करतो असे आमदार बाळासाहेब आजबे शेवटी म्हणाले.




## डॉ.वसंतराव देशपांडे स्मृतीदिनी बरसल्या सुरांच्या धारा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

संगीताच्या बागेतील ब्रम्हकमळ संगीतसूर्य स्व.डॉ.वसंतराव देशपांडे यांच्या पुण्यस्मृतीदिनी ३१ जुलै रोजी आयोजित छोटेखानी संगीत सभेत सुरांच्या धारा बरसल्या.

संगीत सभेची सुरुवात अभियंता आनंद अरूणराव जोशी यांनी केली नंतर बी.के.पांडे,डॉ.अतुल कुंबेफळकर, सुचिता देशपांडे,युगंधरा जोशी, राजदिप जोशी आदींनी गायनाचे सादरीकरण केले.

हार्मोनिअमवर बी.के.पांडे यांनी तर तबल्यावर रत्नदीप शिगे यांनी साथसंगत केली प्रारंभी अविनाश जोशी यांनी प्रास्ताविकात स्मृती सामितीच्या उपक्रमाची माहिती दिली.

उपस्थितांचे आभार अजय जोशी यांनी मानले.

यावेळी श्रीमती आरती जोशी,अपर्णा जोशी, वैष्णवी जोशी,राहूल देशपांडे,सुमित केजकर आदी उपस्थित होते.

## न.प.च्या लेखी आश्वासनानंतर राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे आमरण उपोषण मागे

**परळी । प्रतिनिधी**

संत शिरोमणी रविदास समाज मंदिर सभागृहाचे अर्धवट बांधकाम पूर्ण करावी. या मागणीसाठी परळी नगरपरिषदेसमोर राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने आमरण उपोषण दि. १ ऑगस्ट २०२४ पासून सुरू करण्यात आले होते. या आमरण उपोषणाला वंचित बहुजन आघाडीच्या वतीने पाठिंबा दर्शविण्यात आला होता. दरम्यान परळी नगर परिषदेच्या लेखी आश्वासनानंतर सदरील उपोषणकर्त्यांनी आपले आमरण उपोषण मागे घेतले आहे.




परळी येथील सावता माळी नगर भागातील चर्मकार समाजाच्या सामाजिक सांस्कृतिक कार्यक्रम करण्यासाठी आपण चर्मकार समाजासाठी सभागृहाचे बांधकाम पाच वर्षांपूर्वी सुरु केले आहे. या सभागृहाच्या भिंती कॉलम आणि स्लॅब एवढे काम पूर्ण झाले आहे. सभागृहाच्या वर जाण्यासाठी पायऱ्या, फरशी, खिडक्या गेट, संडास, बाथरूम लाईट, फिटिंग इत्यादी काम करणे बाकी आहे. समाजाला सामाजिक सांस्कृतिक धार्मिक कार्यक्रम घेण्यासाठी या जागे शिवाय दुसरी जागा उपलब्ध नसल्यामुळे समाजाचे आर्थिक नुकसान होत आहे. हे अर्धवट राहिलेले काम दि. ३० जुलै २०२४ पूर्वी चालू करून काम पूर्ण करून द्यावे. या मागणीसाठी ◀◀ पान ३ वर

## महात्मा फुले चौक येथे साहित्यरत्न लोकशाहीर आणणाभाऊ साठे यांना अभिवादन

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरापासुन जवळच आसलेल्या फुलेपिंपळगाव मार्गावर महात्मा फुले चौक येथे जग बदल घालुनी घाव मज सांगुनी गेलेत भिमराव! असा संदेश देणारे तसेच ३५ कादंबऱ्या,२२ कथासंग्रह,३ नाटकं,एक प्रवास वर्णन,१३ लोकनाट्य,१० पोवाडे असे एकूण ९२ अचंबित करणारे साहित्यविष्कार लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांनी निर्माण करुण मराठी साहित्याची पताका १९५० च्या दशकापासूनच आंतरराष्ट्रीय स्तरावर दिमाखात फडकविण्याचे काम करणारे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांना जयंतीनिमित्त लोकशाहीर आणाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पुजन करुण मानवी हक्क अभियानचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा डॉ मिलींद आव्हाड यांच्या हस्ते निळया ध्वजाचे ध्वजारोहण ओबीसी नेते ज्ञानेश्वर मेंडके यांच्या उपस्थितीत करण्यात आले.



या कार्यक्रमासाठी फुले पिंपळगावचे माजी सरपंच दशरथ उंबरे,एकता परिषदेचे जिल्हा अध्यक्ष ज्ञानेश्वर कोरडे,भारतीय बौद्ध महासभेचे तालुका अध्यक्ष डॉ. भागवत साळवे,माजी सरपंच अभिमन्यू साळवे,प्रल्हाद दळवी,शंकरराव खरात,बबन खोपे,मोहन काकडे,माजी नगरसेवक सुतार,गावातील प्रतिष्ठीत नागरीक संपत साळवे,नाना उंबरे,आसाराम उंबरे,श्रीराम उंबरे, माजी ग्राम पंचायत सदस्य तात्यासाहेब साळवे गावातील प्रतिष्ठीत नागरीक,मोठ्या प्रमाणात उपस्थित होते हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अशोक साळवे,राजाभाऊ वजीर,नामदेव चिंचाने,आनंद किरवले,आकाश किरवले,भिमराव हिवाळे,गोपाळ गवळी,दयानंद साळवे,अशोक शिंदे,रामभाऊ पडघन,परसुराम खामकर,चंदु कांबळे,बाळु नाईकनवरे, रामभाऊ खदर,अर्जुन फुलगे यांनी परिश्रम घेतले.

## मूकबधिर शाळा नेकनुर येथे लो.टिळक यांची पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी



**नेकनूर । प्रतिनिधी**

येथील मूकबधिर शाळेत दिनांक एक ऑगस्ट वार गुरुवार रोजी लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती आणि संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष ह.भ.प.नाना महाराज, व प्रमुख पाहुणे म्हणून कल्याण शिंदे, उपसरपंच सचिन शिंदे, धर्मराज काळे सर, पत्रकार तुळजी राम शिंदे, ग्रामपंचायत सदस्य अशोक शिंदे, जयदीप काळे, मुकुंद काळे, केतन रोकडे, गणेश काळे, मयूर खराडे, विक्रम शिंदे,हे सर्व मान्यवर या कार्यक्रमास उपस्थित होते.लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्यातून समाजाची जनजागृती करण्याचा प्रयत्न केला. तसेच स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे आणि तो मी मिळवणारच असी सिंहगर्जना करणारे थोर समाज सुधारक लोकमान्य टिळक यांनी आगरकर आणि विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या साह्याने पारतंत्र्यात जगणाऱ्या भारतीयांच्या मनात सवतंत्र्याविषयी प्रेम निर्माण केले पाहिजे असे त्यांनी आपले सर्व ◀◀ पान ३ वर

## जागर प्रतिष्ठानची वडवणी तालुका कार्यकारीणी बैठक



**वडवणी प्रतिनिधी**

जागर प्रतिष्ठान महा.राज्य संघटनेच्या वडवणी तालुका कार्यकारणी ची तालुका स्तरीय बैठक वडवणी शहरातील रेणुका माता मंदिर येथे पार पडली ,बैठकीत संघटनेच्या पुढील वाटचाली संदर्भात चर्चा झाली तसेच लवकरच जागर प्रतिष्ठान चे वडवणी तालुका पदाधिकारी नियुक्त करण्यात येणार आहेत त्या विषयी सुध्दा चर्चा करण्यात आली तसेच गडकिल्ले संवर्धन व सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी संघटना कटिबध्द असल्याचे सर्वांनी सांगितले या बैठकीला जागर प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष किसन पाटील चव्हाण,बीड जिल्हाध्यक्ष संगम चाळक,विशाल जाधव,आदिनाथ शिंदे,जीवन सवासे,सुनील नाईकवाडे, विष्णू तोगे,अमोल मुंडे,विशाल शेळके ,राम लोणकर,ओम नरवडे,महेश चव्हाण,भैया चव्हाण,उमेश जकाते,वैभव जाधव,प्रशांत इंगळे, नाईकनवरे सर आदी.शिलेदार उपस्थित होते.

## माळेवाडीत मनोज जरांगे पाटील यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा

**माजलगाव । प्रतिनिधी**

संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त माजलगाव तालुक्यातील सुलतानपूर (माळेवाडी) येथे वृक्षारोपणाचे तसेच मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.मनोज जरांगे पाटील यांचा वाढदिवस प्रत्येक गावामध्ये वेगवेगळ्या पद्धतीने साजरा करण्यात येत आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त माळेवाडी मध्ये सर्व समाजातील नव तरुणांनी एकत्र येत गावातील स्मशानभूमी व अहिल्यादेवी मंदिर या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वृक्ष लावण्यात



आली व ते वृक्ष जगवण्याचा संकल्प देखील केला.या वृक्षारोपणासाठी माजलगाव बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे, सरपंच संजय नरवडे,संतोष नरवडे,ऍड. शिवाजीराव निंबाळकर,पाटील साहेब प्रतिष्ठानचे अध्यक्ष राम नरवडे, अंगद ढगे,सुदाम ढगे,दादासाहेब ढगे, विजयकुमार धिरडे, प्रभू नरवडे तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिकांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.त्यानंतर गावातील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात आरोग्य शिबिर संपन्न झाले.या शिबिरामध्ये वयोवृद्ध ◀◀ पान ३ वर

## आपले सरकार पोर्टल असुरळीत; विद्यार्थ्यांचे नुकसान

### आ.नमिता मुंदडा यांनी मुख्यमंत्र्यांनी लक्ष घालण्याची केली विनंती

अंबाजोगाई (प्रतिनिधी)--

संपुर्ण बीड जिल्ह्यात आपले सरकार पोर्टल (महाऑनलाइन) असुरळीत झाले असून सदरील व्यत्ययामुळे विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक नुकसान होत असून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांनी स्वतः लक्ष घालावे अशी विनंती आ. नमिता अक्षय मुंदडा यांनी केली आहे.



या संदर्भात आ. नमिता अक्षय मुंदडा यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांना एक निवेदन दिले असून या निवेदनात पुढे असे म्हटले आहे की,

बीड जिल्ह्यात सद्यस्थितीत ऑनलाईन प्रमाणपत्राचे महाऑनलाईन / आपले सरकार पोर्टल सुरळीत सुरू नसल्याने विद्यार्थ्यांचे विविध आवश्यक प्रमाणपत्रे व मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी आवश्यक प्रमाणपत्रे विहित वेळेत मिळत नसल्याचे तक्रारी नागरिकांकडून प्राप्त होत आहेत. सदरचे कामकाजाबाबत तहसील कार्यालय अंबाजोगाई येथे विचारणा केली असता सदरचे पोर्टल हे कार्यालयीन वेळेमध्ये ४०४ दाखवत असून सर्वर लोड घेत असल्याचे सांगण्यात येत आहे तसेच रात्रीच्या वेळी प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी काम करत असताना पोर्टल हे अत्यंत संथगतीने चालत असल्याचे त्यांनी कळविले आहे. तरी सदर प्रकरणात विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र व मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी आवश्यक प्रमाणपत्र लवकरात लवकर मिळण्याच्या अनुषंगाने सदर पोर्टल सुरळीत सुरू होण्यासाठी आपल्यास्तरावर कार्यवाही करण्यात यावी. सदर प्रमाणपत्राअभावी कोणत्याही विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी कार्यवाही करण्याबाबत आदेश व्हावेत, अशी विनंती आ. नमिता अक्षय मुंदडा यांनी केली आहे.

## अण्णाभाऊ साठेंचे साहित्य विषमतामूलक समाजावर प्रहार करणारे- प्राचार्य डॉ. आर. के. परदेशी

**घनसावंगी । प्रतिनिधी**

दिड दिवस शाळेत जाऊन आंतरराष्ट्रीय साहित्य निर्माण करून भारतीय विषमतामूलक समाजावर आपल्या साहित्यातून अण्णाभाऊ साठेनी जोरदार प्रहार करून शोषित जनतेला आपल्या अस्तित्वाची जाणीव करून दिली. असे प्रतिपादन संत रामदास महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या लोकशाहीर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथी निमित्त कार्यक्रमात अध्यक्ष स्थानावरून बोलतांना प्राचार्य डॉ. आर. के. परदेशी यांनी केले.




प्रारंभी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक आणि अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पगुच्छ अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन अवचार, डॉ.राधेश्याम राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलतांना प्राचार्य डॉ. परदेशी म्हणाले की, भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील असंतोषाचे जनक लोकमान्य टिळक यांनी परकीय शक्तिविरोधी जनमत तयार करून स्वातंत्र्य आंदोलनाला गतिमान केले तर अण्णाभाऊ साठेंनी आपल्या शाहिरीतून संयुक्त महाराष्ट्राची चळवळ उभी करून मुंबई महाराष्ट्रात आणण्यात मोलाची कामगिरी केली. आज या दोनही विभूतींच्या कार्यास नतमस्तक होऊया. कार्यक्रमाचे आयोजन व सूत्रसंचालन डॉ. अवचार यांनी केले तर उपस्थितांचे आभार कार्यक्रमाधिकारी डॉ. राऊत यांनी मानले. यावेळी कार्यक्रमास डॉ. प्रल्हाद होंडे, डॉ. सर्जेराव ताठे, डॉ. सुभाष बी. पवार, प्रा.संदिप जिगे, प्रा.एस.एम.राठोड, डॉ. संदीपसिंह गौर यांच्यासह विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. कार्यक्रम यशस्वीतेसाठी श्री.नरहरी बनसोडे, श्री. कल्याण अडागळे, श्रीमती आशा केवट, श्री.भास्कर तुपे आदींनी परिश्रम घेतले.




**माजलगाव:- सकल मराठा समाजाच्या वतीने संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसा निमित्त जरांगे पाटील यांना दीर्घायुषी मिळावे म्हणून माजलगाव मूकबधिर शाळा येथे फळ वाटप व शालेय साहित्य वृक्षारोपण केले**

## संतमूर्ती प्राणप्रतिष्ठा वर्धापन सोहळ्याचा लाभ घ्यावा-गो.गो.मिसाळ

### तीन दिवसीय सप्ताह सोहळ्याचे आयोजन

**पिंपळवंडी । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील अंमळनेर येथील श्री गणेश मंगल कार्यालय भारत पेट्रोल पंपा जवळील संत मंदिरात प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी सोमवार दि.५ बुधवार ते दि.७ ऑगस्ट २०२४ दरम्यान तीन दिवसीय सप्ताह व संत मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न होत आहे.या सोहळ्याचा पंचक्रोशीतील ग्रामस्थ व भाविक-भक्तांनी बहुसंख्येने उपस्थिती दर्शवून लाभ घ्यावा व शोभा वाढवावी असे आवाहन आयोजन गोपाळराव गोविंदराव मिसाळ सर माजी जिल्हा परिषद सदस्य अंमळनेर गट,सत्यसेन गोपाळराव मिसाळ माजी उपसरपंच अंमळनेर,सौ.संगिता सत्यसेन मिसाळ माजी उपसभापती पाटोदा,डॉ.चित्रसेन गोपाळराव मिसाळ,डॉ.अनिल सानप यांनी केले आहे.



याविषयी माहिती अशी की,श्री बजरंग बली,संत भगवान बाबा,संत वामनभाऊ आदी संत-महंत देवतांच्या संतमूर्ती प्राणप्रतिष्ठा वर्धापन सोहळ्याची हे १० वे वर्ष असून हा भव्य-दिव्य सोहळा ह.भ.प.महंत विठ्ठल महाराज श्री क्षेत्र गहिनीनाथ गड,ह.भ.प.महंत शिवाजी महाराज श्री क्षेत्र नारायण गड,ह.भ.प.महंत डॉ. नामदेव शास्त्री श्री क्षेत्र भगवानगड,ह. भ.प.महंत महादेवानंद भारती महाराज श्री क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थान पिंपळवंडी ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# बारामतीतच अजित पवारांना मोठे आव्हान

**पुणे । प्रतिनिधी**

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी राज्यभर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाची बांधणी करण्यामध्ये, तसेच महायुतीत जास्तीत जास्त जागा पदरात पाडून घेण्यात गुंग असलेल्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासमोर विधानसभेला बारामतीतच मोठे आव्हान उभे राहिले आहे. ज्येष्ठ नेते खासदार शरद पवारांशी पुन्हा एकदा त्यांचा घरच्या मैदानावर सामना रंगणार आहे.

पवार कुटुंबीयांचे बारामती विधानसभेसाठी लक्ष केंद्रित

लोकसभा निवडणुकीत खासदार सुप्रिया सुळे यांच्याविरोधात अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार उभ्या असतानाही बारामतीकरांनी पन्नास हजारांहून अधिक मतांचे मताधिक्य सुळे यांना दिले आहे. बारामती विधानसभेत नेहमीच मताधिक्याचे वेगवेगळे विक्रम करून विजयी होणाऱ्या अजित पवार यांच्यासमोर सुळे यांना मिळालेल्या या पन्नास हजारांच्या मताधिक्याचे काय करायचे? हा मोठा प्रश्न आगामी विधानसभा निवडणुकीत उभा राहिला आहे. ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार यांनी आता बारामती विधानसभा मतदारसंघात मोठ्या प्रमाणावर लक्ष घातले आहे. त्यांच्या जोडीला खासदार सुप्रिया सुळे यांच्यासह अजित पवारांचे पुतणे युगेंद्र पवार आणि आमदार



आमदार रोहित पवार, युगेंद्र पवार यांच्या मातोश्री शर्मिलाताई पवार, रोहित पवार यांच्या मातोश्री सुनंदाताई पवार या सर्वच पवार कुटुंबीयांनी आता बारामती विधानसभेमध्ये आपले लक्ष केंद्रित केलेले दिसते.

युगेंद्र पवार बारामतीमध्ये सक्रिय

शरद पवार यांनी लोकसभा निवडणूक संपताच बारामतीतील गाव न गाव पिंजून काढण्यास सुरुवात केली आहे. युगेंद्र पवार हे बारामतीमध्ये फार मोठ्या प्रमाणावर सक्रिय झालेले आहेत आणि इतरही पवार कुटुंबीय विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून जनसंपर्काच्या प्रयत्नात असल्याने, आगामी काळातही बारामतीची ही निवडणूक फार चुरशीची होणार आणि या वेळी प्रथमच अजित पवारांसमोर घरातूनच मोठे आव्हान उभे ठाकलेले दिसेल, असेही जाणकार बोलत आहेत.

लोकसभेचा फटका विधानसभेलाही बसू शकेल

आगामी काळात अजित पवार यांना विधानसभेच्या निवडणुकीत कठीण काळ पाहावा लागेल, असे बारामतीतील राजकीय जाणकार बोलत आहेत. गेल्या ३० वर्षांत अजित पवारांचा स्वभाव आणि इतर काही कारणांनी राजकारणातून डावलले गेलेल्यांची संख्या प्रचंड मोठी आहे. त्याचा फटका लोकसभेला अजित पवार यांना बसला आहे, तसाच फटका विधानसभेलाही बसू शकतो, असे अनुमान काढण्यास आता सुरुवात झाली आहे.

बारामतीत आणखी एक विपरीत निर्णय होऊ शकतो.

आधीच राज्यासह पुणे जिल्ह्यातही अजित पवारांच्या उमेदवारांसमोर महाविकास आघाडीचे मोठे आव्हान आगामी निवडणुकीत उभे राहिलेले आहे. पुणे जिल्ह्यातील प्रत्येक विधानसभा मतदारसंघात अजित पवारांच्या उमेदवारांना विजयासाठी झगडावे लागणार आहे, अशी स्थिती आहे. त्यांना मदत करीत असतानाच अजित पवारांना आपल्या बारामतीकडे अजिबात दुर्लक्ष करून चालणार नाही, तसे झाल्यास बारामतीत आणखी एक विपरीत निर्णय होऊ शकतो.

अजित पवारांच्या शिलेदारांसमोर महाविकास आघाडीचे मोठे आव्हान

पुणे जिल्ह्यातही आंबेगाव, जुन्नर, खेड, इंदापूर, मावळ या सध्यातरी अजित पवार यांच्याकडे येण्याची शक्यता असलेल्या मतदारसंघांत अजित पवारांच्या शिलेदारांसमोर आगामी निवडणुकीत महाविकास आघाडीचे मोठे आव्हान असणार आहे. या उमेदवारांच्या विजयाकडे लक्ष देत असतानाच अजित पवार यांना बारामतीवर लक्ष केंद्रित करावे लागणार आहे.



पिंपरी चिंचवड : ॲडव्होकेट असोसिएशनच्या वतीने वकील बार रूम लोकशाहीर सहित्यरत्न व मराठी भाषेला जागतिक स्तरावर सन्मान मिळून देणारे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती साजरी करण्यात आली. या वेळी माजी अध्यक्ष ड.नारायण (नाना) रसाळ, ड. सुदाम साने, ड.जे.के काळभोर, ड.अमोल लक्ष्मण खांडेकर, ड.अरुण (मामा) खरात, ड.बी.के कांबळे,ड. नारायण थोरात, ड.संगीता कुशलकर,ड.पूनम शर्मा,ड.सागर अडागळे,ड.मंगेश नढे इ.वकील मान्यवरांनी यांनी आण्णाभाऊ साठे कार्याबद्दल व त्यांचे विचार या संदर्भात माहिती दिली तसेच यावेळी साहित्यारत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना भारत रत्न देण्यात यावा याची उपस्थित वकील मान्यवरांकडून मागणी करण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन पिंपरी चिंचवड डव्होकेट असोसिएशनच्या अध्यक्षा ड.प्रमिला गाडे, उपाध्यक्ष ड.गोरख कुंभार, महिला सचिव ड.वर्षा तिडके, सदस्य ड.जयेश वाकचौरे, ड.साक्षी धुमाळ, ड.तेजश चवरे, ड.विशाल पौळ यांच्याकडून करण्यात आले.

# शिक्षणाच्या माहेर घरात भाईगिरी थांबेना!

## तरुणावर धारदार शस्त्राने हल्ला, दहशत माजवत रील बनवून केलं व्हायरल

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहर परिसरात मोठ्या प्रमाणावर गुन्हेगारी वाढताना दिसत आहे. दिवसेंदिवस क्षुल्लक कारणावरून वाद, हाणामारी, खून यांचे प्रमाण प्रचंड वाढत चाललं आहे. हातात कोयता घेऊन परिसरात दहशत निर्माण करणं असो किंवा मग सोशल मिडियावर रील शेअर करून दहशत निर्माण करणं असो असे प्रकार गेल्या काही दिवसांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढले आहेत. गुन्हेगारांना पोलिसांचा धाक उरला आहे कि नाही असा प्रश्न निर्माण झाला आहे.



पिझ्झा मिळाला नाही म्हणून हॉटेल चालकाला मारहाण केल्याची घटना ताजी असतानाच आता शहर परिसरात हा खळबळजक प्रकार घडला आहे. तरुणावर धारदार शस्त्राने चौघांनी हल्ला केल्याची घटना समोर आली आहे. पुण्याच्या वाघोली परिसरातील बकोरी फाट्यावरील जय महाराष्ट्र खाऊ गल्लीत एका तरुणावर कोयत्याने हल्ला केला, या हल्यात तो गंभीर जखमी झाला. हल्ल्यानंतर तरुणांनी मारहाणीचा व्हिडिओ तयार करून तो सोशल मीडियावर ठेवत दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. या घटनेमधील चारही आरोपी अल्पवयीन असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे, लोणीकंद पोलीस तपास करत आहे. या घटनेमध्ये प्रमोद देशमुख हा तरूण जखमी झाला आहे. तर हल्लेखोरांची नावे अद्याप समजू शकलेली नाही. प्रमोद देशमुखवर कोयत्याने हल्ला करण्यात आला. या हल्यात तो गंभीर जखमी झाला. या आरोपींनी मारहाणीचा व्हिडिओ सोशल मीडियावर देखील व्हायरल केला आहे. हे चारही आरोपी अल्पवयीन असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

# पिंपरीत तीन वर्षांच्या चिमुरडीचा मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

सोसायटीचा स्लाईड गेट अंगावर पडून पिंपरीत तीन वर्षांच्या एका चिमुरडीचा जागेवरच मृत्यू झाल्याची घटना घडली. हातात बाहुली घेऊन खेळायला गेलेली ही चिमुरडी जागेवरच संपली. हृदय पिळवून टाकणारी ही घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली आहे. गिरीजा शिंदे असं या चिमुरडीचं नाव असून तिच्या मृत्यूमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

नेहमीप्रमाणे ही तीन वर्षांची चिमुकली आपल्या मित्रांसोबत खेळायला गेली होती. खेळताना हातात बाहुली घेऊन ती पळत सुटली. तेवढ्यात तिच्यासोबत खेळत असलेल्या मुलाने सोसायटीचे स्लाइड होणारं गेट ओढलं. मात्र या गेटमध्ये बिघाड असल्याने ते गेट थेट गिरिजाच्या अंगावर पडल आणि गिरिजाचा खेळता खेळताच शेवट झाला. पिंपरी- चिंचवडच्या बोपखेल परिसरात ही धक्कादायक घटना घडली. हातात बाहुली घेऊन गिरीजा खेळत असताना अचानक तिच्या अंगावर गेट पडलं. हा प्रकार पाहून आजूबाजूच्या मुलांनी शेजारच्यांना आवाज दिला. त्यावेळी आजूबाजूचे लोक पळत आले आणि तिला उचलून दवाखान्यात नेण्याच्या प्रयत्न केला. मात्र त्यापूर्वीच गिरिजाचा मृत्यू झाला होता. घरातलं तीन वर्षाचं बाळ गेल्याने परिवारात शोककळा पसरली आहे.

# आधी अपहरण केलं, मारहाण करून जबरदस्तीने गुगल-पे वरुन उकळले पैसे

## पुण्यातील वाघोलीतील धक्कादायक घटना

**पुणे । प्रतिनिधी**

भाजी खरेदी करण्यासाठी पायी जाताना धक्का लागल्याने झालेल्या वादातून थेट तरुणाचे अपहरण करून त्याला मारहाण केल्याचा धक्कदायक (झींपिश उीळाश छश्रु) प्रकार घडला आहे. पुण्यातील वाघोली रोडवर ही घटना घडली आहे. एवढच नाही तर अपहरण केल्यानंतर जबरदस्तीने गुगल-पे वरुन पैसे उकळले आहेत. पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने या प्रकरणी पाच तरुणांना अटक केली आहे. लुकमान हासमत हश्मी यांनी याप्रकरणी लोणीकंद पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. कुमार पवार, नितीन पवार, ओम गव्हाणे, मनोज निंबाळकर आणि विकास कांबळे यांना पोलिसांनी



अटक केली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वाघोली रोडवर फिर्यादींचे भाऊ भाजी खरेदी करण्यासाठी पायी गेले होते. त्यावेळी एका १७ वर्षाच्या मुलाने फिर्यादीच्या खांद्याला धक्का दिला, म्हणून फिर्यादीने त्यास पाहून चालत जा असे म्हणाले. या गोष्टीचा त्याला राग आला आणि त्याच्या साथीदाराने त्यांना मारहाण करायला सुरुवात केली. मारहणीवरच न थांबता त्या तरुणाने त्याच्या इतर साथीदारांना बोलवून घेतले. पिडीतांना चक्क गाडीमध्ये बसवून जबरदस्तीने एका अज्ञात स्थळी नेले आणि तिथे त्यांच्याकडून जबरदस्तीने गुगल पेवरुन १८ हजार रुपये घेतले. या सगळ्या प्रकरणानंतर पिडीत यांनी पोलिसांकडे धाव घेतली. पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने सापळा रचून या तरुणांना आज ताब्यात घेऊन अटक केली.

# आंद्रा धरण भरले ; इंद्रायणीच्या पाणी पातळीत वाढ होणार



**पुणे । प्रतिनिधी**

वडगाव मावळ येथील आंद्रा धरण पूर्ण क्षमतेने भरले आहे. धरणाच्या सांडव्यातून इंद्रायणी नदीत पाणी सोडले जात असल्याने इंद्रायणी नदीच्या पाणी पातळीत वाढ होणार आहे.

आंद्रा धरणाची क्षमता ८२.७५ टीएमसी आहे. मागील काही दिवसांपासून मावळ परिसरात होत असलेल्या मुसळधार पावसामुळे धरण गुरुवारी (दि. १) १०० टक्के क्षमतेने भरले आहे. हे धरण द्वारविरहित आहे. त्यामुळे धरण भरल्यानंतर सांडव्यावरून पाण्याचा विसर्ग केला जातो. सध्या धरण भरले असल्याने सांडव्यावरून २१० क्युसेक क्षमतेने पाण्याचा विसर्ग सुरु आहे. पाऊस आणि धरणातील पाण्याचा येवा वाढत गेल्यास यामध्ये वाढ होणार आहे. आंद्रा धरणाचा विसर्ग इंद्रायणी नदीत मिसळतो. त्यामुळे इंद्रायणी नदीच्या पाणी पातळीत वाढ होणार आहे.

परिसरातील नागरिकांनी नदीपात्रात उतरू नये. नदीपात्रात काही तत्सम साहित्य अथवा जनावरे असल्यास तात्काळ हलविण्यात यावीत. नागरिकांनी खबरदारी बाळगावी, असे आवाहन पाटबंधारे विभागाकडून करण्यात आले आहे.

# लाल दिव्याची घाई नडली; पद, अधिकार गमावून बसली

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्हाधिकारी कार्यालयापासून सुरू झालेले पूजा खेडकर प्रकरण सध्या केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) कारवाईपर्यंत पोहोचले आहे. प्रशिक्षणार्थी आयएएस म्हणून काम करताना त्यांनी केलेल्या विविध मागण्या आणि खासगी आलिशान वाहनावर महाराष्ट्र शासन असा फलक लिहून शासकीय कार्यालयांमध्ये वावर करणे त्यांना चांगलेच महागात पडले आहे. त्यांच्या नियुक्तीवरच प्रश्नचिन्ह उपस्थित झाल्यामुळे चौकशीच्या विविध फेर्यांत अडकलेल्या पूजा यांच्यावर यूपीएससीने थेट प्रशिक्षणार्थी आयएएस पदच रद्द करण्याची कठोर कारवाई केली आहे.



खासगी गाडीवर लाल दिवा लावणे आणि स्वतंत्र दालनाचा आग्रह धरल्यामुळे त्या सुरुवातील चर्चेत आल्या. नंतर त्यांचे शारीरिक अपंगत्व आणि नॉनक्रिमिलेअर प्रमाणपत्र संशयास्पद असल्याचे समोर आले. आपल्या चमकोगिरीमुळे चर्चेत आलेल्या पूजा प्रशिक्षणार्थी असतानाही त्यांनी स्वतःला स्वतंत्र दालन आणि सरकारी गाडीची मागणी केली होती. त्यानंतर त्यांनी चक्क एका अधिकार्याचे दालन बळकावून तेथे स्वत:साठी फर्निचर नेऊन ठेवले. हे कमी म्हणून की काय, स्वत:च्या खासगी कारवर अंबर दिवा लावला. या कृतीनंतर त्या नव्याने वादाच्या भोवर्यात सापडल्या.

बुडत्याचा पाय खोलात

प्रशिक्षणाच्या काळात त्यांनी प्रशासनाचे कामकाज समजून घेणे आणि इतर गोष्टी शिकणे अपेक्षित असते. पूजा यांनी मात्र कामाच्या ठिकाणी रुजू होण्याच्या आधीपासून अवास्तव मागण्या करणे सुरू केले. यामुळे बुडत्याचा पाय खोलात, अशी त्यांची अवस्था होत गेली. पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात वादग्रस्त ठरल्यानंतर त्यांचा प्रशिक्षण कालावधी स्थगित करण्याचे आदेश महाराष्ट्र सरकारने दिले. दरम्यान, आता यूपीएससीने कडक कारवाईचा बडगा उगारून त्यांचे प्रशिक्षणार्थी आयएएस हे पदच रद्द केले आहे. एवढेच नव्हे, तर यापुढे यूपीएससीच्या कोणत्याही परीक्षांना बसण्यास त्यांच्यावर बंदी घालण्यात आली आहे.

# नव युवामतदारांना १६ ऑगस्टपर्यंत मतदार यादीत नाव नोंदवता येणार

**पुणे । प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार पुणे जिल्ह्यात सुरू असलेल्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण मोहिमेत उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन नव युवामतदारांनी आपले नाव १६ ऑगस्ट २०२४ पर्यंत मतदार यादीत नोंदवावे, असे आवाहन उपजिल्हाधिकारी तथा स्वीप समन्वयक अर्चना तांबे यांनी केले आहे.

पुरंदर विधानसभाअंतर्गत भेकराईनगर येथील एसपी इन्फोसिटी कंपनी येथे आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी मतदार नोंदणी अधिकारी बाळासाहेब ढवळे पाटील, निवडणुक नायब तहसीलदार संतोष सानप, कंपनीचे अधिकारी, कर्मचारी आदी उपस्थित होते.

श्रीमती तांबे म्हणाल्या, आगामी विधानसभा निवडणूक २०२४ च्या



अनुषंगाने अद्ययावत मतदार यादी तयार करण्यात येणार आहे. यादृष्टीने जिल्ह्यात सर्व विधानसभा मतदारसंघात विशेष संक्षिप्त पुनरीक्षण मोहिमेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमाद्वारे जनजागृती करण्यात येत आहे. या मोहिमेत नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे. मोहिमेअंतर्गत मयत अथवा स्थलांतरीत मतदाराचे नाव वगळणे, नावामध्ये किंवा पत्त्यात दुरुस्ती करणे आदी कार्यवाही करण्यात येत आहेत. नागरिकांना ऑनलाईन पद्धतीने किंवा नजीकच्या मतदान केंद्रावर नाव नोंदणी करता येणार आहे. नवमतदार नावनोंदणीसाठी मतदारांनी अर्ज क्र. ६, मयत अथवा स्थलांतरीत मतदाराचे नाव वगळण्याकरीता अर्ज क्र.७, आणि नावामध्ये किंवा पत्यामध्ये दुरुस्ती करण्याकरीता अर्ज क्र. ८ सादर करावा. नागरिकांनी व्होटर हेल्पलाईन ॲप डाऊनलोड करून मतदार यादीत नाव नोंदविता येईल, अशी माहिती यावेळी देण्यात आली. पुरंदर विधानसभा मतदारसंघाच्यावतीने भेकराईनगर येथील या कार्यक्रमातएसपी इन्फोसिटी या कंपनीतील ४०० अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

याचप्रकारे चिंचवड विधानसभा मतदारसंघाच्यावतीने केशवनगर आणि कसबा पेठ विधानसभा मतदारसंघाच्यावतीने बाजीराव रोड येथील सरस्वती मंदिर नाईट कॉलेज कॉमर्स व आर्ट्स, रास्ता पेठ येथील डॉ.सायरस पूनावाला जूनियर कॉलेज, नामदेव शिंपी सभागृह, के.सी.ठाकरे शाळा, नामदेव शिंपी सभागृह आदी ठिकाणी विशेष मतदार नावनोंदणी अभियान राबविण्यात आले.

# चित्रपट ओटीटीवर रिलीज करण्याच्या बहाण्याने चित्रपट निर्मात्याची १२ लाखांची फसवणूक

**पुणे । प्रतिनिधी**

चित्रपट ओटीटीवर रिलीज करण्याचे आश्वासन दिले. तो रिलीज केला. मात्र त्यातून मिळणारे पैसे न देता चित्रपट निर्मात्याची फसवणूक केली. ही घटना एप्रिल २०२१ ते ३० जून २०२४ या कालावधीत सुप्रीम हेडक्वार्टर, बाणेर येथे घडली. बलभीम सखाराम पठारे (वय ५७, रा. अहमदनगर) यांनी याप्रकरणी हिंजवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार व्हीमास एशिया कंपनी प्रा लीचे संचालक साकेत सावंत (रा. बदलापूर), संचालिका आणि इतर दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांच्या अक्षर फिल्मस प्रा ली निर्मित सांजीदा चित्रपट आरोपींनी त्यांच्या व्हीमास एशिया या ओटीटीवर रिलीज करून देतो असे सांगितले. त्यासाठी फिर्यादीकडून सात लाख पाच हजार ८०० रुपये घेतले. त्यानंतर दिनेश जगताप यांच्या दिनिशा फिल्मस या कंपनीकडून कमिशनपोटी पाच लाख ४० हजार रुपये घेतले. आरोपींनी एकूण १२ लाख ४५ हजार ८०० रुपये घेतले. चित्रपट ओटीटीवर रिलीज केला. मात्र त्याचे पैसे फिर्यादी यांना न देता स्वतःच्या फायद्यासाठी वापरून फसवणूक केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. हिंजवडी पोलीस तपास करीत आहेत.